# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे अधिवेशन, २०१७

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २२, १९३९ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(३)** | **कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९४**

---

### एकविरा देवीच्या मंदिरावरील सुवर्ण कळस चोरीस गेल्याबाबत

**(१) * ३४७१२ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेहेरगांव, लोणावळा (जि.पुणे) येथील एकविरा देवीच्या मंदिरावरील सुवर्ण कळस माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान चोरीस गेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंदिराच्या सुरक्षितेसाठी सुरक्षा रक्षक व पोलीस बंदोबस्त असताना मंदिरावरील कळस चोरीस गेल्याची घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंदिराचा सुवर्ण कळस चोरणाऱ्या आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे काय, त्यानुषंगाने सुरु असलेल्या कारवाईची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) एकविरा मंदीर सुरक्षिततेकरीता पोलिसांचे गार्ड असून सदर गार्ड हे मंदिरातील गाभाऱ्याच्या सुरक्षिततेचे काम पाहतात.

(३) सदर प्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १४३/२०१७ भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील मिरकरवाडा बंदराबाबत

**(२) * ३५८८३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील मिरकरवाडा बंदर टप्पा-२ वर आतापर्यंत रुपये ५२ कोटी खर्च केल्याचा दावा मेरीटाईम बोर्डाने केला असला तरी निधीचा अभाव व नियंत्रण ठेवणाऱ्या विभागाचे दुर्लक्ष यामुळे प्रत्यक्षात बंदरातील गाळाचा प्रश्न जैसे थे असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंदाजपत्रकातील सर्व कामे पूर्ण करुन दिनांक ३१ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास सदर बंदर मस्त्यविकास विभागाकडे सुपूर्द करायचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत संरक्षक भिंती व्यतिरिक्त अन्य कामांचा आरंभही झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर ठिकाणावरील विकास कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी नियोजन व निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) सदर कामाकरीता आतापर्यंत केंद्र शासनाकडून रुपये १६.३४ कोटी व राज्य शासनाकडून रुपये १९.५० कोटी असा एकूण रुपये ३५.८४ कोटी इतका निधी प्राप्त झालेला असून सर्व निधी खर्च करण्यात आलेला आहे. कामाची

निकड लक्षात घेता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या स्वनिधीतून उर्वरित खर्च करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत सदर ठिकाणी ७० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.
(३) नाही.

पश्चिमेकडील लाटरोधक भिंतीचे काम पूर्ण झाले आहे. उत्तरेकडील लाटरोधक भिंतीचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. त्याचप्रमाणे गाळ काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे. गाळ काढल्यानंतर गाळाच्या काही भागाचा वापर जागा तयार करण्यासाठी करण्यात येणार आहे.
(४) सदर कामासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता आवश्यक रुपये ३५ कोटीची मागणी सादर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील ताडदेव येथील एमपी मिल कंपाऊंड झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत

**(३) * ३४८९४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ताडदेव येथील एमपी मिल कंपाऊंड झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील गैरव्यवहार प्रकरणी तसेच घाटकोपर व कांदिवली येथील समतानगर या ठिकाणच्या म्हाडाच्या पुनर्वसन प्रकल्पातील गैरव्यवहाराप्रकरणी विधीमंडळाच्या सभागृहांमध्ये मा.गृहनिर्माण मंत्री यांच्यावर झालेल्या आरोपांच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांनी सभागृहात घोषित केल्यानुसार मा.गृहनिर्माण मंत्री यांची चौकशी सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीचे स्वरुप व कार्यकक्षा काय आहेत, तसेच चौकशी काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) न.भू.क्र.७२५ (पै)/१/७२५(पै) आणि ३/७२५ (पै) मलबार हिल येथील नियोजित महाराष्ट्र नगर डी वॉर्ड तसेच जायफळवाडी आणि जनता हिल झोपडपट्टी पुनर्वसन योजने संदर्भात गृहनिर्माण विभागाच्या धारिकेतील प्रस्तावावर चौकशी करण्यासाठी, महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ मधील कलम १७(३) नुसार, मा.राज्यपाल महोदयांनी मा.लोक आयुक्त यांना सदर प्रकरण निर्देशित केले असून मा. लोक आयुक्त यांचेकडे सदर चौकशीची कार्यवाही सुरु आहे

(२) स्वरुप व कार्यकक्षा विभागास अवगत नाहीत.

(३) या प्रकरणी मूळ दस्तऐवज गृहनिर्माण विभागाच्या अधिकाऱ्यांनी समक्ष उपस्थित राहून मा.लोक आयुक्त यांचेकडे सादर केलेला आहे.

-----------------

## पुणे शहरातील बीआरटीच्या कामासाठी नेमलेल्या सल्लागारांवर अनावश्यक खर्च करण्यात येत असल्याबाबत

**(४) * ३५२४५ श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक २७१४४ ला दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात महानगरपालिकेच्या कोट्यवधी रुपयांच्या बीआरटी कामासाठी सल्लागार नेमूनही नंतर त्याकामात अनेक त्रुटी आढळत असून त्यामुळे लाखो रुपयांची सल्लागारांना दिलेली फी वाया जात असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार बीआरटी कामांसाठी चुकीच्या सल्लागारांवर होणारा खर्च रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)

• पुणे महानगरपालिकेच्या बी.आर.टी. प्रकल्पांतर्गत ८ रस्त्यांच्या कामांकरीता नियुक्ती केलेल्या तज्ञ सल्लागारांना अद्यापपर्यंत रू. ४ कोटी ८१ लाख एवढी फी अदा करण्यात आलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

• सदरची कामे करताना या सल्लागारांमार्फत प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणावरील प्रयोगशाळा व त्रयस्थ प्रयोगशाळेमध्ये कामाच्या दर्जाबाबत तांत्रिकदृष्ट्या तपासणी केली जाते. त्यामध्ये त्रुटी आढळून आल्यास तज्ञ सल्लागारांच्या सूचनेनुसार सदर कामांमध्ये आवश्यक दुरूस्ती तातडीने केली जाते व विहित मानकांनुसार काम झाल्यानंतर त्याचे देयक अदा करण्यात येते.

• अद्यापपर्यंत एकूण ४ रस्त्यांची कामे निश्चित केलेल्या मानकानुसार पूर्ण करण्यात आलेली आहेत.

• उर्वरित ४ रस्त्यांपैकी मुंबई-पुणे रस्त्यातील २ कि.मी. लांबीचे काम अंतिम टप्प्यात असून बोपोडी व खडकी कॅन्टोंन्मेंट हद्दीतील जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

• गणेशखिंड रस्त्याचे ४० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित रस्त्यासाठी जागा उपलब्ध करून घेण्यात येत आहेत.

• संगमवाडी रस्त्याचे काम अद्याप सुरू केले नसून कामातील रस्ता रूंदीकरणाच्या जागेबाबत मिळकतदारांशी समन्वय साधून कामाचे नियोजन करण्यात येत आहे.

• पुणे-सातारा रस्त्याचे ४० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम सुरू आहे.

• त्यामुळे या कामामध्ये अनेक त्रुटी आढळून येतात ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

• पुणे महानगरपालिकेच्या दिनांक २०/९/२०१७ च्या महासभेच्या विशेष बैठकीच्या विविध प्रकल्पांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागारांची नांवे, त्यांनी केलेली कामे व त्यांना अदा केलेली फी याबाबतची माहिती महासभेत सादर करण्यात आली होती. तथापि, सदर सभा तहकूब करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली औद्योगिक परिसरातील प्रोबेस कंपनीत झालेल्या अपघातातील नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत

**(५) * ३४८२९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक ३२३२४ ला दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) औद्योगिक परिसरातील प्रोबेस कंपनीत दिनांक २६ मे, २०१६ रोजी झालेल्या भीषण स्फोटात १२ लोक मृत्यूमुखी पडले तर १०० हून अधिक नागरिक जखमी झालेले होते, सदर घटनास्थळी मा.मुख्यमंत्री महोदय यांनी भेट देवून सदरहू स्फोटाची जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमून या स्फोटाची चौकशी करून एक महिन्यात चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू चौकशी अहवाल तात्काळ जाहीर करावा व बाधित नागरिकांना महसूल विभागाने केलेल्या पंचनाम्यानुसार नुकसान भरपाई देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ व दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी केली असूनही आजमितीस संबंधित दुर्घटनाग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे आहे, सदरहू स्फोटामध्ये प्रोबेस एन्टरप्राईस या कारखान्यातील ७ व्यक्ती (४ कामगार व ३ भोगवटादाराचे नातेवाईक) शेजारील एस. आर. फ्रॅग्रन्स कारखान्यातील २ कामगार, हर्बट ब्राऊन फार्मास्युटीकल्स ॲन्ड रिसर्च् लॅबारेटरीज या कारखान्यातील १ कामगार व बाहेरील २ व्यक्ती अशा एकूण १२ व्यक्ती मृत झाल्या असून २१४ व्यक्तींना किरकोळ जखमा झाल्या आहेत.

सदरहू अपघाताची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास १ महिन्यात सादर करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७/०४/२०१६ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती नेमण्यात आली होती.

(२) या संदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीने दिनांक २४/७/२०१७ रोजी चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे. त्यानुसार मृत पावलेल्या कामगारांना कारखाना व्यवस्थापनाकडून देण्यात आलेल्या नुकसान भरपाईचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

(i) मे. प्रोबेस एन्टरप्राईज हया कारखान्याच्या भोगवटादाराने या कारखान्यात मृत झालेल्या ४ कामगारांपैकी ३ कामगारांसाठी रुपये २४,४८,४००/- इतकी नुकसान भरपाईची रक्कम श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त, ठाणे यांच्याकडे जमा केली आहेत. त्यापैकी २ मृत कामगारांच्या वारसांना रुपये १७,००,८००/- इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले असून एका कामगारास रुपये ७,४७,६००/- इतकी नुकसान भरपाईची रक्कम देण्यात येत आहे. उर्वरित एक कामगार राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत नोंदणीकृत असल्याने त्यांच्या वारसांना रुपये २४३/- प्रतीदिवस याप्रमाणे पेंशन मंजूर झालेली आहे.

(ii) मे. एस. आर. फ्रॅग्रन्स, डोंबिवली या कारखान्यात मृत झालेल्या २ कामगारांपैकी १ कामगार राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत नोंदणीकृत असल्याने त्यांच्या वारसांना (आई व वडील यांना) प्रत्येकी रुपये ६३.१४/- प्रतीदिवस याप्रमाणे पेंशन मंजूर झालेली आहे. दुसऱ्या मृत कामगाराच्या वारसास कारखान्याच्या भोगवटादाराने रुपये ३,००,०००/- इतकी नुकसान भरपाई रक्कम दिली आहे.

(iii) हर्बर्ट ब्राऊन फार्मास्युटीकल्स ॲन्ड रिसर्च लॅबोरेटरीज, डोंबिवली या कारखान्यात मृत पावलेल्या एका कामगाराच्या वारसास नुकसान भरपाई देण्याकरीता कारखाना भोगवटादाराने रुपये ६,६४,१०७/- इतकी रक्कम आयुक्त, श्रमिक नुकसान भरपाई, ठाणे यांच्याकडे जमा केली असून, सदर रकमेचे वाटप करण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरु आहे.

(३) सदर अपघातात मृत झालेल्या १२ व्यक्तींपैकी ९ मृत व्यक्तींच्या वारसांना रुपये २ लक्ष या प्रमाणे एकूण रुपये १८ लक्ष इतके अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहायता निधीतून वाटप करण्यात आले आहे. उर्वरित ३ व्यक्ती भोगवटादार कारखान्याच्या कुटूंबातील असल्याने त्यांच्या वारसांना अद्याप मुख्यमंत्री सहायता निधीतून अर्थसहाय्य देण्यात आलेले नाही. मे. प्रोबेस एन्टरप्राईज या कारखान्याच्या भोगवटादाराने सदर कारखान्यात मृत झालेल्या ४ कामगारांच्या वारसांना रुपये ४,४०,०००/- इतके सानुग्रह अनुदान अदा केले आहे. मे.एस. आर. फ्रॅग्रन्स, डोंबिवली या कारखान्याच्या भोगवटादाराने सदर कारखान्यात मृत झालेल्या एका कामगाराच्या वारसास रुपये ३,००,०००/- इतके सानुग्रह अनुदान अदा केले आहे. या स्फोटामध्ये जखमी झालेल्या २१४ व्यक्तींच्या वैद्यकीय उपचाराच्या प्रतीपूर्तीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून रुपये २६,४१,९१०/- इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी आतापर्यंत १४२ जखमी व्यक्तींना रुपये २४,४९,४९०/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

सदर परिसरातील नुकसानीबाबत महसूल विभागाने एकूण २६६० पंचनामे केले होते. त्यास अनुसरुन रुपये ७,४३,२७,९९०/- इतक्या रकमेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यामार्फत दिनांक १६/६/२०१६ रोजी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे सादर करण्यात आला होता. तथापि, मुख्यमंत्री सहायता निधीकक्षाने प्रस्तूत प्रकरणी संबंधित मालमत्ता धारकाने प्रोबेस कंपनीवर नुकसान भरपाई दावा दाखल करणे आवश्यक आहे, असे निर्देश महसूल विभागास दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मराठी व उर्दू माध्यमाच्या अनुदानित शाळांना निवासी दराने कर लागू करणेबाबत

**(६) * ३५०४७ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील मराठी व उर्दू माध्यमाच्या अनुदानित शाळांना महापालिकेच्या करातून सवलत द्यावी या मागणीसाठी मा.अध्यक्ष, विधानसभा यांच्यासह महानगरपालिका महापौर, उपमहापौर व आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका आणि शाळांच्या संस्थाचालकांची एक बैठक सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान संपन्न झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान एक समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) औरंगाबाद महानगरपालिकेचे दिनांक १६/०७/२०१६ चे कार्यालयीन आदेशान्वये शैक्षणिक संस्थेच्या मालमत्ता कराचा अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती.

अतिरिक्त आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांची बदली झाल्यानंतर सदर समितीच्या रचनेमध्ये सुधारणा करुन दिनांक ३१/१२/२०१६ च्या कार्यालयीन आदेशान्वये मुख्य लेखा परिक्षक, औरंगाबाद महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

(३) सदर समितीचा अहवाल अदयाप प्राप्त झालेला नाही.

(४) शैक्षणिक संस्थांचे जबाब घेणे, इतर महानगरपालिकेकडून माहिती घेणे तसेच शिक्षण संस्थांना निवासी दराने कर आकारणी करता येईल किंवा कसे याबाबत समितीकडून अभ्यास करण्यात येत असल्याने विलंब झाला आहे.

-----------------

## चिक्की व अन्य सामुग्रीची नियमबाहय शासकीय खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७) * ३५४७९ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिला व बालविकास विभागांतर्गत करण्यात आलेल्या चिक्की व अन्य सामुग्रीची नियमबाहय शासकीय खरेदी व त्यात झालेल्या गैरव्यवहारासंबंधी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे चौकशी अधिकारी यांनी कोणतीही चौकशी न करता ज्यांचेवर आरोप आहेत त्याच विभागाकडून अभिप्राय मागवून विभागाचे अभिप्रायाप्रमाणे चौकशी अधिकाऱ्याचा निष्कर्ष दिलेला असून सदर अहवाल माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या चौकशी अधिकारी व त्यांना त्याप्रमाणे अहवाल सादर करावयाच्या सूचना देणाऱ्या संबंधित वरिष्ठांना निलंबित करुन त्यांचेविरुध्द गुन्हे दाखल करण्याबाबत तसेच सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. तथापि, महिला व बालकल्याण विभागाकडून अंगणवाडीतील विद्यार्थ्यांकरिता पुरविण्यात येणाऱ्या शिक्षणोपयोगी साहित्य, पौष्टिक आहार इ. बाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीचा अहवाल शासनास दिनांक ८ डिसेंबर, २०१६ च्या पत्राने प्राप्त झालेला आहे.
(२) होय, तसे पत्र प्राप्त झाले आहे.
(३) व (४) चौकेशी पुर्ण झाली असली तरीही उक्त पत्रातील मुद्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे.

-----------------

## मुंबईतील एल्फिन्स्टन रेल्वे स्थानकातील दुर्घटनेबाबत

**(८) * ३४९१० श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.रविंद्र फाटक, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.प्रविण दरेकर, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एल्फिन्स्टन रेल्वे स्थानकाच्या अरुंद असलेल्या पुलावर दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या चेंगराचेंगरीत २३ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मृत व्यक्तींच्या कुटूंबियांना व जखमी व्यक्तींना कोणत्या प्रकारची आर्थिक मदत राज्य शासनाकडून देण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त दुर्घटनेनंतर मुंबईतील सर्व रेल्वे स्थानकातील गर्दीच्या व्यवस्थापनाचा मुद्दा निदर्शनास आला असून जवळ-जवळ सर्वच रेल्वे स्थानकातील पादचारी पुल अतिशय अरुंद असून चर्नीरोड (पूर्व) येथील रेल्वे पुलाची देखील दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर दुर्घटनेतील प्रति मृत व्यक्तीच्या वारसास रुपये ५ लाख प्रमाणे राज्य शासनाकडून तात्काळ आर्थिक मदत देण्यात आली आहे. जखमी व्यक्तींवर के.ई.एम रुग्णालयात मोफत उपचार करण्यात आले आहेत.

(३), (४) व (५) पादचारी रेल्वे पुलांवरील गर्दीचे व्यवस्थापनाच्या दृष्टीने पादचारी रेल्वे पुलांचे बाबतीत रुंदीकरण करणे, नवीन बांधकाम करणे तसेच लांबी वाढविणे अशी कामे रेल्वेमार्फत नियोजन करण्यात आले आहे तसेच पादचारी रेल्वे पुलांवरील गर्दीचे व्यवस्थापनाच्या दृष्टीने अतिरिक्त सुरक्षा दलाची व्यवस्था करण्यात आली आहे. चर्नीरोड (पूर्व) येथील पादचारी रेल्वे पुलाची दुरुस्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

-----------------

## राज्यातील एम.सी.व्ही.सी. मधील पद भरतीबाबत

**(९) * ३५३२९ प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, प्रा.जोगेन्द्र कवाडे** : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एम.सी.व्ही.सी. मधील पद भरतीमध्ये ५० टक्के भरतीची अट घातल्याने ज्या शाळेत एक पद आहे तिथे पद भरती करण्यास परवानगी देत नसल्याचे माहे सप्टेंबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक पद असलेल्या शाळांमधील सर्व पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळांमधील शिक्षकांना कोणतेही मानधन न घेता गेल्या दोन वर्षांपासून ज्ञानदानाचे कार्य करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत + २ स्तरावरील किमान कौशल्य आधारीत व्यवसाय अभ्यासक्रमाकरीता एक पुर्णवेळ शिक्षक तसेच पुर्णवेळ शिक्षक (प्रात्यक्षिक) असे दोन शिक्षक कार्यरत असतात. जर दोन्ही पदे रिक्त झाल्यास ५०% च्या भरती अटीनुसार शिक्षकाचे पद भरले जाते.

वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दिनांक २५/०५/२०१७ अन्वये जे प्रशासकीय विभाग सेवार्थ/शालार्थ प्रणालीतील त्रुटी दुर करुन आकृतिबंध नव्याने अंतिम करुन घेतील त्याच विभागांना वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दिनांक ०२/०६/२०१५ च्या शासन निर्णयानुसार पदभरतीस मुभा आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत +२ स्तरावरील किमान कौशल्य आधारीत व्यवसाय अभ्यासक्रमाच्या अनुदानित संस्थांचा आकृतिबंध अद्यापि नव्याने अंतिम झाला नसल्यामुळे पद भरतीस परवानगी देण्यात आलेली नाही.

(२) उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत (एम.सी.व्ही.सी.) एक पद असलेल्या शाळा नाहीत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या चटई क्षेत्र धोरणाबाबत

**(१०) * ३५७७७ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३१६५९ ला दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार अतिरिक्त अथवा शिल्लक असलेल्या चटई क्षेत्राच्या आधारे मंजूर केलेल्या नकाशा व्यतिरिक्त केलेल्या अधिकच्या बांधकामाचे दंड आकारुन नियमितीकरण (Regularization) करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमबाहय बांधकाम करुन दंड आकारुन नियमित करता येत असल्याने विकासकाकडून याचा गैरफायदा घेतला जात आहे तसेच अनेक उच्चभ्रु इमारतीमध्ये रिफ्युज एरियाचा (अग्निशमन) व पार्किंगसाठीच्या जागेत रहिवाशीचा वापर केला जात असल्याचे निदर्शनास येत असून याकडे महानगरपालिका दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वसामान्याचे हित जपण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणात बदल करण्यात येवून नवीन नियमावली तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मध्ये बांधकाम नियमानुकुल करणेच्या तरतूदी आहेत. जर चटई क्षेत्र निर्देशांक शिल्लक असेल व विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतूदीनुसार बांधकाम नियमानुकुल होत असेल तर मंजूर नकाशाव्यतिरिक्त अधिकचे बांधकाम नियमानुकुल करणेस पात्र राहिल. महानगरपालिकेने नियमानुसार कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेकडून कार्यवाही होत असल्याचे महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(२) विकास नियंत्रण नियमावलीनुसार अग्निशमन उद्देशाचे तसेच वाहनतळासाठी आवश्यक असलेले क्षेत्र हे चटई क्षेत्र निर्देशांकामध्ये गणणेत येत नाही. अशा क्षेत्रफळावर रहिवास योग्य असे बांधकाम करता येत नाही, तसे आढळल्यास महानगरपालिकेच्या संबंधित विभागामार्फत कारवाई करण्यात येते.
(३) अशी बाब नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मेट्रो-३ प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(११) * ३४७०७ श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाच्या कामांसाठी गिरगांव आणि काळबादेवी येथील १९ इमारतीची जागा लागणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारतीमधील किती निवासी व किती व्यावसायिक गाळे बाधित होणार आहेत,
(३) असल्यास, या बाधित होणाऱ्या इमारतीचे डीसीआर ३३ (७) नुसार कोठे पुनर्विकास केला जाणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) सदर बाधित इमारतीमध्ये २७८ निवासी सदनिका व ३४५ व्यावसायिक गाळे बाधित होत आहेत.
(३) व (४) गिरगांव आणि काळबादेवी येथील बाधित इमारतींचा पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावलीच्या (डीसीआर) कलम ३३ (७) नुसार त्याच जागेवर समूह विकासाव्दारे केला जाणार आहे.

-----------------

## शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, वर्धा यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याबाबत

**(१२) * ३५४७७ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, वर्धा यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ३० हजाराची लाच स्वीकारताना दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन पाठवून त्यांना तात्काळ निलंबित करून त्यांच्या सर्व गैरकारभाराची चौकशी करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यांच्याविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) आरोपी लोकसेवक श्री. डूरे शिक्षणाधिकारी, जि.प. वर्धा यांना शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ०९/११/२०१७ आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्याविरूध्द दाखल गुन्हयात पुढील तपास सुरू आहे.

-----------------

## वांद्रे (पूर्व), मुंबई येथील म्हाडा मुख्यालयाच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(१३) * ३५५४७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे (पूर्व), मुंबई येथील म्हाडाच्या मुख्यालयाच्या तळमजल्या पासून स्वच्छता गृहापर्यंत इमारतीला सर्वत्र बांबूचे टेकू लावण्यात आले असून ४० वर्षापूर्वी बांधलेल्या या इमारतीच्या भिंतींना व खांबांना अनेक ठिकाणी तडे गेले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर इमारतीचे स्ट्रक्टरल ऑडिट करून इमारतीची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार म्हाडा मुख्यालयाच्या तळ मजल्यावरील कक्ष क्र. ३२ येथील स्वच्छतागृहात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून काही लाकडी टेकू लावण्यात आले असून इमारतीत अन्य कोठेही टेकू लावण्यात आलेले नाहीत. भिंतींना व खांबांना काही ठिकाणी तडे गेले

असल्याने संरचनात्मक दुरुस्तीची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मुख्यालयाच्या काही भागाची मे, २०१७ मध्ये संरचनात्मक दुरुस्ती पूर्ण करण्यात आली. सदरहू काम प्रगतीपथावर असताना दुरुस्तीच्या कामात वाढ झाल्याचे निदर्शनास आल्याने सप्टेंबर, २०१७ मध्ये इमारतीचे पुन्हा संरचनात्मक परिक्षण (Structural Audit) मे. एस. पी. बागवे यांचेमार्फत करुन घेण्यात आले व त्यांनी दिलेल्या अहवालावर आधारित संरचनात्मक दुरुस्तीच्या सुधारित अंदाजपत्रकास दिनांक १६/११/२०१७ रोजी सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

संरचनात्मक दुरुस्तीच्या उर्वरित कामाबाबत फेरनिविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती केली जाईल व गृहनिर्माण भवनाच्या उर्वरित भागाचे काम हाती घेण्यात येईल असे देखील मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील वाहतुक कोंडीची समस्या सोडविणेबाबत

**(१४) * ३५१७९ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहराचे प्रवेशद्वार असलेल्या व्दारका सर्कल भागात सततच्या वाहतुक कोंडीमुळे नागरिकांना व वाहन चालकांना अत्यंत गैरसोयीचा सामना करावा लागत असून दिनांक ९ व १० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास वाहतुक कोंडी टाळण्यासाठी करण्यात आलेले वाहतुकीचे नियोजन देखील अयशस्वी ठरले व वाहतुक कोंडीची समस्या जैसे थे असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्दारका सर्कल परिसर वाहतुकीच्यादृष्टीने अत्यंत गजबजलेले ठिकाण असून याठिकाणी पुणे, मुंबई, औरंगाबाद, धुळे, शिर्डी व आजुबाजूच्या ग्रामीण भागात ये-जा करणाऱ्या वाहनांमुळे वाहतुक कोंडीत भर पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्दारका सर्कल व त्यास जोडणाऱ्या रस्त्यांवर असलेले अतिक्रमण, अनधिकृत फेरीवालेही या परिसरात असल्याने वाहतुक कोंडीची समस्या तीव्र झाली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उड्डाणपुलाची निर्मिती, भुयारी मार्ग इत्यादी उपाय योजूनही वाहतुक कोंडीची समस्या सुटत नसल्याने जनतेची गैरसोय होत असल्याने वाहतुक कोंडीची समस्या सोडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाशिक शहरातील व्दारका परिसर अत्यंत गजबजलेला मध्यवर्ती व दाट रहदारीचा परिसर असून, या भागात बँका, हॉस्पिटल्स, शाळा, व्यावसायिक संकुले, हॉटेल्स व अत्यंत दाट वर्दळ असल्याने या परिसरात वाहतुकीचा प्रचंड ताण पडून वाहतुकीची कोंडी होत असते.

ही कोंडी सोडविण्याकरीता दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी प्रायोगिक तत्वावर वाहतुकीचे नियोजन करण्यात आले. तथापि, वाहनांची संख्या अधिक असल्याने ही चाचणी अयशस्वी झाली.
(२) हे खरे आहे.

या परिसरात नाशिक-पुणे व मुंबई-आग्रा हे राष्ट्रीय महामार्ग एकत्र येत असल्याने, तेथे वाहनांची दाट वर्दळ आहे.
(३) व (४) अंशत: खरे आहे.

व्दारका सर्कल येथील सार्वजनिक रस्त्यावर अडथळा ठरणारी २ अनधिकृत धार्मिक स्थळे महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आलेली आहेत.

तसेच या ठिकाणची काही व्यवसाय, गॅरेज व फेरीवाले यांची अतिक्रमणे महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आली आहेत.

व्दारका परिसरातील व्यावसायिकांना दैनंदिन लायसन्स फी तत्वावर देण्यात आलेली महानगरपालिकेची जागा मोकळी करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली होती. मात्र संबंधितांनी मा.न्यायालयाकडून स्थगिती आदेश प्राप्त केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कौटुंबिक न्यायालयात सुविधा देण्याबाबत

**(१५) * ३५९७४ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कौटुंबिक न्यायालयात सीसीटीव्ही यंत्रणा, पोलीस मदत केंद्र, दाखलपूर्व समुपदेशन केंद्रासाठी स्वतंत्र व्यवस्था, ग्रंथालय, वकिलांना बार रुम, लॉकर इत्यादी सुविधा उपलब्ध नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील कौटुंबिक न्यायालयात उपरोक्त सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे येथील कौटुंबिक न्यायालयाच्या सुविधाबाबत दिनांक १७/८/२०१७ रोजी दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली होती.

सध्या राज्यात २६ कौटुंबिक न्यायालये कार्यरत आहेत. त्यामध्ये खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध आहेत.

१. सीसीटिव्ही : १५ कौटुंबिक न्यायालये
२. पोलीस मदत केंद्र : १४ कौटुंबिक न्यायालये
३. दाखलपूर्व समुपदेशन केंद्रासाठी स्वतंत्र व्यवस्था : ८ कौटुंबिक न्यायालये
४. ग्रंथालय : २२ कौटुंबिक न्यायालये
५. वकिलांना बार रुम : २१ कौटुंबिक न्यायालये
६. लॉकर : ८ कौटुंबिक न्यायालये

(२) मा.न्यायालयाच्या मागणीनुसार कौटुंबिक न्यायालयासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.

सदर प्रकरणी पुणे येथील कौटुंबिक न्यायालयासाठी सीसीटीव्ही यंत्रणेबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांना प्रस्ताव सादर केलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) शहरातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी निधी मिळण्याबाबत

**(१६) * ३४८४५ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) शहरातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी निधी मिळण्याकरिता शहराचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून शासनास पाठविण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार जिल्हा प्रशासनाकडून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) नुसार स्वच्छ भारत अभियानांतर्गत नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २०१६ व केंद्र शासनाने वेळोवेळी सुधारित केलेले नियम विचारात घेऊन येवला येथे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत येवला नगरपरिषदेच्या रुपये ४.४६९० कोटी किंमतीच्या नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास दिनांक १०/११/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील सायबर गुन्हयांना प्रतिबंध घालण्याबाबत

**(१७) * ३५९२० आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सायबर गुन्हयांच्या प्रमाणात वाढ होत असून यामध्ये मागील सहा वर्षात दाखल करण्यात आलेल्या १० हजार ४१९ सायबर गुन्हयांमधील ७ हजार २५२ गुन्हयांची उकल करण्यात पोलिसांना अपयश आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत सायबर गुन्हयांची नोंद होण्याचे प्रमाण सर्वाधिक असून या गुन्हयांमध्ये क्रेडीट कार्डव्दारे फसवणूक करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गुन्हयांमधील फक्त ०.३ टक्के गुन्हयांमध्येच आरोपींना शिक्षा झाली असून दोषारोप सिध्द होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, मुंबईसह राज्यातील सायबर गुन्हयांना प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जानेवारी, २०१२ पासून ऑक्टोबर, २०१७ पर्यंत राज्यात माहिती व तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत राज्यात १२०४७ गुन्हे नोंद झाले आहेत. त्यापैकी ३६०२ गुन्हयांची उकल झाले आहे.

(२) होय हे खरे आहे.

सन २०१२ पासून ऑक्टोबर, २०१७ पर्यंत मुंबई शहरात माहिती व तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत ४३४२ गुन्हे नोंद झाले असून त्यापैकी १८०१ गुन्हे हे क्रेडिट कार्ड किंवा डेबिट फ्रॉर्डबाबत आहेत.

(३) हे खरे नाही.

मुंबई शहरातील सायबर गुन्हयांचे दोषसिध्दी प्रमाण ३१ टक्के असून राज्यातील हे प्रमाण २४ टक्के इतके आहे.

(४) राज्यातील सर्व जिल्हे व पोलीस आयुक्तालयांमध्ये स्थापित एकुण ४७ सायबर लॅब/ तंत्रज्ञानयुक्त गुन्हे अन्वेषण केंद्राना सायबर पोलीस ठाणे असे घोषित करण्यात आले आहे. या ठिकाणी तपासाकरीता आवश्यक आधुनिक यंत्रसामुग्री (सॉप्टवेअर व हार्डवेअर) पुरविण्यात आली असून इतर सामुग्री पुरविण्यात येत आहे. सायबर गुन्हयांमध्ये अटक करण्यात आलेल्या आरोपींविरुध्द दोषारोप सिध्द होण्यासाठी पोलिसांना नियमितपणे प्रशिक्षण देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना शासकीय नोकरीत सामावून घेणेबाबत

**(१८) * ३६०११ श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना “क” वर्ग शासकीय नोकरीत प्राधान्य दिले जाईल असे मा.मुख्यमंत्री महोदय यांनी धोरणात्मक बाब म्हणून ठरविले असल्याची माहिती मा.परिवहन मंत्री यांनी जाहीर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांचे सर्वेक्षण आणि नोकरी उपलब्धतेबाबत कृती आराखडा तयार केला आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना शासकीय नोकरीत सामावून घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (म.लो.आ. च्या कक्षेबाहेरील) गट-क पदांच्या भरतीप्रक्रियेत जर उमेदवारांना समान गुण मिळाले तर कोणत्या उमेदवारास प्राधान्य द्यावे याबाबत शासन निर्णय, सा.प्र.वि., दिनांक ०५/१०/२०१५ अन्वये विहित करण्यात आलेल्या प्राधान्यक्रमांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांचा समावेश करण्याच्या प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार यासंदर्भातील शासन आदेश दिनांक ०२/१२/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## किमान कौशल्य विभागात काम करणाऱ्या शिल्प निदेशकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(१९) * ३५६१६ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३३१५९ ला दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किमान कौशल्य विभागात काम करणाऱ्या शिल्प निदेशकांच्या मानधनाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २ फेब्रुवारी, २०१७ रोजी समान काम समान वेतनाचा आदेश दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य वगळता इतर राज्यात शिल्प निदेशकांना कमीत कमी १५,०००/- रुपये मानधन दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करीत नसल्याने शिल्प निदेशकांच्या संघटनांनी याबाबत आंदोलने व उपोषणे केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिल्प निदेशाकांच्या मानधन वाढीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१७ रोजीचे शिल्प निदेशकांच्या मानधनाबाबतचे कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत.

(२) गुजरात, कर्नाटक व राजस्थान या राज्यात पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) या योजनेंतर्गत कंत्राटी तत्वावरील नेमणूक केलेल्या निदेशकांना कमीत कमी प्रति माह रू. १४,०००/- इतके मानधन डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांचे दिनांक २१/०६/२०१४ च्या पत्रानुसार मंजूर करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र राज्यात देखील कंत्राटी तत्वावरील नेमणूक केलेल्या निदेशकांना प्रतिमाह रू. १५,०००/- इतके मानधन देण्यात येते.

(३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील तासिका तत्वावरील शिल्प निदेशकांनी मानधन वाढीबाबत उपोषणे केलेली आहेत, हे खरे आहे.

(४) व (५) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सैध्दांतिक व प्रात्यक्षिक तासिका घेण्यासाठी तासिका तत्वावरील निदेशकांच्या मानधनात प्रती तासिका दरात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## गेवराई (जि.बीड) पोलीस ठाणे अंतर्गत गुन्ह्याच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(२०) * ३५११६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथील बँक अधिकारी घाडगे यांच्या घरावर दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास पहाटे दरोडेखोरांनी टाकलेल्या दरोड्याच्या घटनेत घाडगे दाम्पत्याचा खून करून घरातील इतरांना जबर मारहाण करण्यात आली, तसेच मौजे रेवाकी येथे दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास मोठ्या वाहनातून तिक्ष्ण हत्यारधारी भाडोत्री गुंड आणून दहशत पसरविण्याचा प्रकार घडल्यानंतरही या प्रकरणात कोणासही अटक करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाचा तपास करण्यास पोलिसांना अपयश आले असून सुमारे तीन महिन्यानंतरही प्रकरणातील मुख्य आरोपीस अटक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेवराई पोलीस ठाणे अंतर्गत गुन्हयाच्या प्रमाणात झालेली वाढ तसेच तपास करण्यात पोलिसांना येणारे अपयश यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भिती व दहशत पसरली असल्याने दरोडा आणि इतर प्रकरणाचा तपास करून आरोपींना शिक्षा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गेवराई जि.बीड येथील बॅक अधिकारी श्री. घाडगे हे दिनांक २३/०८/२०१७ रोजी घरात झोपले असता आरोपींनी त्यांना व त्यांच्या पत्नीस कुऱ्हाडीने डोक्यात मारुन ठार मारले व मुलीस जखमी करुन घरातील रोख रक्कम व दागिने चोरुन नेले, हे खरे आहे. या प्रकरणी गेवराई पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४४५/२०१७ भा.दं.वि. कलम ३०२, ४६०, ३९७ प्रमाणे गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयात ३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

दिनांक १६/०८/२०१७ रोजी मौजे रेवकी येथे घडलेल्या घटनेबाबत प्राप्त तक्रारीवरुन गेवराई पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांनी सदर ठिकाणी भेट दिली असता देवकी फाट्याजवळ एक लोखंडी कत्ती मिळून आली आहे. याप्रकरणी अदखलपात्र गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. सदर कत्ती कोणाची आहे हे अद्याप निष्पन्न झालेले नाही.
(२) गेवराई पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.नं. ४४५/२०१७ भा.दं.वि. कलम ३०२, ४६०, ३९७ या गुन्हयात ३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण झालेला आहे.
(३) माहे ऑक्टोंबर, २०१६ ते माहे ऑक्टोंबर, २०१७ या कालावधीत गेवराई पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल गुन्हयांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | गुन्ह्याचा प्रकार | माहे ऑक्टोंबर, २०१७ अखेर | | माहे ऑक्टोंबर, २०१६ अखेर | | घट/ वाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | दाखल | उघड | दाखल | उघड | |
| १ | खुन | ०४ | ०४ | ०३ | ०३ | +१ |
| २ | खुनाचा प्रयत्न | ०९ | ०९ | ०२ | ०२ | +७ |
| ३ | दरोडा | ०२ | ०२ | ०३ | ०३ | -१ |
| ४ | जबरी चोरी | ०२ | ०१ | ०७ | ०५ | -५ |
| ५ | घरफोडी | ०७ | ०१ | ०८ | ०१ | -१ |
| ६ | चोऱ्या | ४२ | १२ | ४६ | २४ | -६ |
| ७ | दंगा | १८ | १८ | १० | १० | +८ |
| ८ | दुखापत | ४८ | ४८ | ४३ | ५३ | -५ |
| ९ | बलात्कार | ०५ | ०५ | ०२ | ०२ | +३ |
| १० | इतर | ९६ | ७९ | १३४ | १११ | -३८ |

माहे ऑक्टोंबर, २०१६ ते माहे ऑक्टोबर, २०१७ या तत्सम कालावधीत सन २०१७ मध्ये खुन, खुनाचा प्रयत्न, दंगा व बलात्कार या गुन्ह्यात वरीलप्रमाणे किंचित वाढ झालेली असुन दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, चोऱ्या, दुखापत व इतर गुन्ह्यात घट झालेली आहे.

तसेच, दरोडा व इतर प्रकरणात आरोपींविरुध्द प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन मुदतीत दोषारोपपत्र दाखल करण्यात येते.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरात सार्वजनिक शौचालये बांधण्याबाबत

**(२१) * ३५३७३ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराची लोकसंख्या १५ लाखापेक्षा जास्त असल्याने किमान १०० ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता असून महिलांसाठी पुरेशी सार्वजनिक शौचालये नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात फक्त ६ ठिकाणी सार्वजनिक शौचालये सुरू आहेत, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत १४ ठिकाणी सार्वजनिक शौचालये बांधकामाचे महानगरपालिकेचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका प्रशासन कागदोपत्री काम प्रगतीपथावर असल्याचा दावा करीत असली तरी सार्वजनिक शौचालये उभारण्यासाठी महापालिकेला कुठेच जागा मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

औरंगाबाद शहरात सार्वजनिक शौचालयाचे एकुण ४० युनिट वापरात असून त्यामध्ये एकूण ४५४ सीट्स उपलब्ध आहेत. या ४५४ सीट्स पैकी २०२ सीट्स महिलांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

(२) औरंगाबाद शहरात सार्वजनिक शौचालयाचे एकूण ४० युनिट्स वापरत आहेत. या व्यतिरिक्त शहरात पुढीलप्रमाणे सामुदायिक / सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | स्थळ | शौचालयाच्या सीट्स | | | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|---|---|
| | | महिलांसाठी | पुरुषांसाठी | एकूण | |
| १. | राजनगर, मुकुंदवाडी | ५ | ५ | १० | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) |
| २. | शताब्दीनगर | ५ | ५ | १० | महानगरपालिका निधी |
| ३. | बिबीका मकबरा परिसर, | ५ | - | ५ | |
| ४. | ज्यूबली पार्क परिसर, | ५ | - | ५ | |
| ५. | औरंगपुरा | ५ | - | ५ | |
| ६. | पैठणगेट | ५ | - | ५ | |
| ७. | एन-८ बॉटनिकल गार्डन | ५ | - | ५ | |
| ८. | हर्ष नगर (फाजलपुरा) | ५ | ५ | १० | १३ व्या वित्त आयोग |
| ९. | आंबेडकर नगर | ५ | ५ | १० | |
| १०. | मिसरवाडी | ५ | ५ | १० | |
| ११. | मुकुंदवाडी भाजीमंडई | ५ | ५ | १० | सीएसआर निधी (लायन्स क्लब औरंगाबाद) |
| १२. | आनंदगाडे चौक | १६ | ३० | ४६ | |
| १३. | कबीरनगर | ४ | ४ | ८ | |
| १४. | क्रांती नगर | ५ | ५ | १० | |
| | **एकूण** | **८०** | **६९** | **१४९** | |

(३) सार्वजनिक शौचालय बांधण्यासाठी जागा सुलभतेने उपलब्ध होत नाही, हे खरे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक शौचालय बांधकामासाठी शहरात जागा उपलब्ध करण्याबाबत प्रयत्न करण्यात येत असून, जागेच्या उपलब्धतेनुसार सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोलिसांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत

**(२२) * ३५२१६ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २६८५७ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलिसांच्या त्रासदायक डयुटीमुळे त्यांच्या कुटुंबियांना त्रास होत असल्याने त्यात सुधारणा करण्याची मागणी कुटुंबियांकडून होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आठ तासांची डयुटी, ओव्हर टाईम, अतिकामाचा ताण, त्यामुळे निर्माण होणारे आजार, सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी, हक्काची घरे व चांगला पगार इत्यादी प्रश्नांबाबत पोलीस कुटुंबातील महिलांच्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई आयुक्तालयांतर्गत तसेच काही जिल्ह्यामध्ये आठ तास कर्तव्य प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे २४ तासाच्या कालावधीत सतत १० तासांच्यावर बंदोबस्त डयुटी किंवा इतर कामासाठी कर्तव्यावर हजर रहावे लागल्यास पोलीस उपनिरीक्षक/ सहायक पोलीस उपनिरीक्षक / फोटोग्राफर यांना रुपये १५००/- प्रतिमाह तसेच, पोलीस हवालदार / पोलीस नाईक / पोलीस शिपाई (सशस्त्र व निशस्त्र) यांना रुपये १३५०/- प्रतिमाह या दराने दिनांक ०१/१२/२०१७ पासून अतिकालीक (आहार) भत्ता मंजूर करण्यात आला आहे.

पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्या साप्ताहिक सुट्टी अतिशय महत्वाच्या कामाव्यतिरीक्त रद्द करण्यात येऊ नयेत अशा सूचना घटक प्रमुखांना वेळोवेळी देण्यात आल्या असून महत्वाच्या प्रसंगी साप्ताहिक सुट्टी रद्द केल्यास संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांना साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात १ दिवसाचे वेतन (मुळ वेतन अधिक भत्ते) दैनिक भत्ता म्हणून देण्याचे आदेश शासन निर्णय, दिनांक ०३/०८/२०१५ अन्वये देण्यात आलेले आहेत.

अतिकामाचा ताण येऊ नये या करीता पोलीस मुख्यालयात ताणतणाव मुक्तता शिबीरे घेतली जात असुन, तज्ञांकडुन योगाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने थकबाकीची कार्यवाही संबंधित पोलीस घटक कार्यालयाकडुन करण्यात येते.

राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना स्वमालकीची घरे विकत घेता यावी यासाठी शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक २०/०२/२०१५ नुसार घर बांधणी अग्रिम मंजुर करण्यात येते, तसेच राज्यातील सर्व घटक प्रमुखांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील इच्छुक कर्मचाऱ्यांसाठी स्वमालकीची घरे बांधणेसंबंधात दिनांक २२/०७/२०१६ च्या शासन पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्टयपूर्ण योजनांसाठी अनुदान देण्याबाबत

**(२३) * ३५८५६ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुवर्ण जयंती नगरोत्थान व इतर वैशिष्टयपूर्ण योजनांसाठी नगरपरिषदांना १० टक्के ते २० टक्के लोकवर्गणी भरावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बहुतांशी नगरपरिषदांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने त्यांना लोकवर्गणी भरणे शक्य होत नाही व त्यामुळे प्रकल्प वेळेत पुर्ण होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील नगरपरिषदांना विविध वैशिष्टयपूर्ण योजनांसाठी पुर्ण अनुदान देण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

- महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियानांतर्गत राज्यातील नगरपरिषदांच्या मंजुर प्रकल्पाना अ वर्ग नगरपरिषदाना २५ टक्के, ब वर्ग नगरपरिषद १५ टक्के, क वर्ग नगरपरिषदा/ नगरपंचायती यांना १० टक्के स्वहिस्सा भरणे क्रमप्राप्त आहे.
- वैशिष्टयपूर्ण योजनेंतर्गत १० टक्के स्वहिस्सा भरणे क्रमप्राप्त आहे.

(२) हे खरे नाही.

- बहुतांश नगरपरिषदा या नगरपरिषद निधीमधून त्याचा स्वहिस्सा भरत असतात.
- तसेच वित्त आयोगाच्या निधी मधूनही स्वहिस्सा भरणे अनुज्ञेय असल्याने स्वहिस्सा अभावी प्रकल्प वेळेत पुर्ण होत नाही असे म्हणता येणार नाही.
- तसेच आवश्यकतेनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी (मुन्फ्रा) च्या माध्यमातून सुलभ कर्ज देखील देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

(३) • केंद्र शासनाच्या धोरणानुसार प्रकल्पासाठी आवश्यक स्वहिश्याचा निधी संबंधित नागरी स्थानिक संस्थेने उभारणे हा सुधारणात्मक उपाययोजनेचा भाग आहे.

- त्याच धर्तीवर राज्य शासनाच्या उपरोक्त योजनांसाठी आवश्यक १० ते २५ टक्के स्वहिश्याचा निधी स्वनिधी, १४ वित्त आयोग किंवा सुलभ कर्जाद्वारे उभारणे क्रमप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहराच्या जुन्या हद्दीच्या विकास आराखडयाबाबत

**(२४) * ३४९७१ ॲड.जयदेव गायकवाड : तारांकित प्रश्न क्रमांक १५५८८ ला दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या जुन्या हद्दीच्या विकास आराखडयातील २७० आरक्षणांवर हरकती व सूचनांची सुनावणी होऊन ५ महिने झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५ महिने होऊनही त्याबाबतचा अहवाल नगर रचना विभागाने शासनाकडे सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शहराच्या विकास आराखडयाची (डी.पी.) अंमलबजावणी होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतचा अहवाल शासनाकडे सादर न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) भागश: खरे आहे, पुणे शहराच्या मुळ हद्दीची विकास योजना शासनाने दिनांक ०५/०१/२०१७ रोजी मंजूर केलेली असून त्यावेळी यामधील आरक्षणाबाबतचे १७८ व रस्त्याबाबतचे ६३ इतके याप्रमाणे एकुण २४१ सारभूत स्वरुपाचे फेरबदल दिनांक ०५/०१/२०१७ रोजीच्या नोटीसी द्वारे नागरीकांकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केलेले असून याबाबत संबंधितांना सुनावणी देऊन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करणेसाठी सहसंचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे यांची नियुक्ती केली आहे.

(२) व (३) याबाबतचा अहवाल नियुक्त अधिकारी तथा सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांनी दिनांक ०१/०९/२०१७ रोजी शासनास सादर केलेला असून त्यापुढील मान्यतेबाबतची कार्यवाही शासनस्तरावर कार्यवाही मध्ये आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगर कांदिवली (पश्चिम) येथील पोलिसांच्या वसाहतीसाठी आरक्षित भूखंडावर अनधिकृत झोपडया बांधण्यात आल्याबाबत

**(२५) * ३५८३४ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर कांदिवली (पश्चिम) येथील एकता नगरात मुंबई पोलिसांच्या वसाहतीसाठी आरक्षित असलेल्या म्हाडाच्या भूखंडावर पंचगंगा सेवा सोसायटी नावाची नियोजित सोसायटी बनवून अनधिकृत झोपडया बांधण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

म्हाडाच्या अहवालानुसार कांदिवली (प.) येथील एकता नगर हा म्हाडाचा अभिन्यास सीटीएस क्र. ४७१, सर्व्हे क्र. १५७ (भाग) अन्वये असून त्याचे एकूण क्षेत्रफळ ९१,३७२.०४ चौ.मी. आहे. सदर अभिन्यासामध्ये पोलीस स्टेशनचे आरक्षण असलेला ३८०३.९५ चौ.मी. चा भूखंड आहे.

प्रश्नामध्ये नमुद पंचगंगा सेवा समिती नावाची झोपडपट्टीवासीयांची नियोजित सोसायटी ही म्हाडाच्या भूखंडावर नसुन बाजुच्या जिल्हाधिकारी, उपनगरे यांच्या मालकीच्या भूखंडावर असल्याचे आढळते.

सदर पोलीस स्टेशनाच्या भूखंडावर झोपडपट्टी अस्तित्वात असुन सदर झोपडपट्टी जवळपास सन २००० पूर्वीपासून असल्याचे आढळते. भूखंडाचा काही भाग रिक्त आहे. भूखंडाच्या काही भागावर शासन निर्णय क्र.टिपीबी/४३०८/२९९३/प्र.क्र.३३१/२००८/नवि-११, दिनांक १०/०८/२००९ अन्वये मेट्रो कारशेडचे आरक्षण आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात स्पार्क या संस्थेने निकृष्ट दर्जाची शौचालये बांधल्याबाबत

**(२६) * ३५६६५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने शहरात वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत स्पार्क या संस्थेमार्फत बांधण्यात आलेली ३०९ शौचालये निकृष्ट दर्जाची असल्यामुळे त्यांची दुरूस्ती व काही शौचालये पाडण्याकरिता महानगरपालिकेला सुमारे सव्वा कोटी रूपयांचा खर्च आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शौचालयांच्या बांधकामासाठी महानगरपालिकेने रुपये २ कोटी २५ लाख ७५ हजार खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या अभियंत्यांनी सदर संस्थेने बांधलेल्या शौचालयांच्या कामाच्या दर्जाकडे लक्ष न दिल्याने हे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून अशा कामांना मंजुरी देऊन महानगरपालिकेचे नुकसान करणाऱ्या अभियंत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच उक्त निकृष्ट बांधकामाबाबत संबंधित स्पार्क या संस्थेवर कारवाई करून शौचालयांच्या पुनर्बांधणी व दुरूस्तीचा सर्व खर्च सदर संस्थेकडून वसूल करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत स्पार्क या संस्थेमार्फत कंत्राट लॉट क्रमांक ८ व ९ अंतर्गत सन २००५ ते २०१५ या कालावधीत एकूण ९६ शौचालये बांधण्यात आली होती.

कंत्राट लॉट क्रमांक ८ अंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयांचा उत्तरदायित्व कालावधी संपण्याआधीच, सदर कामामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असल्याची बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेची निदर्शनास आली.

सदर ९६ शौचालयांपैकी ९३ शौचालयांच्या संरचनात्मक लेखापरीक्षणानुसार, १ शौचालय सुस्थितीत असून, ९२ शौचालये तोडून नव्याने बांधण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घेण्यात आला.

सदर ९२ शौचालयांपैकी २ शौचालये तोडून नव्याने बांधण्यासाठी रुपये ७४.८२ लाख इतका खर्च करण्यात आला आहे.

(३) कंत्राट लॉट क्रमांक ९ अंतर्गत शौचालय बांधण्याची कामे सुरु असतांना, स्पार्क या संस्थेस कामाचा दर्जा सुधारण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नोटीस देण्यात आली होती.

स्पार्क संस्थेच्या कामामध्ये सुधारणा न झाल्यामुळे त्यांना महानगरपालिकेमार्फत कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांची सर्व कंत्राटे रद्द करण्यात आली व त्यांना पाच वर्षांकरिता काळया यादीत टाकण्यात आले आहे.

(४) व (५) स्पार्क या संस्थेमार्फत बांधण्यात आलेली उर्वरित शौचालये तोडून नव्याने बांधण्यासाठी लागणारा अंदाजित रुपये ४० कोटी इतका खर्च स्पार्क या संस्थेकडून वसुल करण्यासाठी न्यायालयीन खटला दाखल करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

-----------------

## भायखळा (मुंबई) येथील महिला कारागृहातील कैद्याच्या हत्या प्रकरणाबाबत

**(२७) * ३४७९५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३३९९७ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील महिला कारागृहामध्ये दिनांक २३ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मंजूळा शेटे हिच्या हत्येप्रकरणी सहा आरोपींच्या बचावासाठी मदत करणाऱ्या भायखळा कारागृहाच्या डी.आय.जी. तसेच खोटा शवविच्छेदन अहवाल देणाऱ्या डॉक्टरांवर अद्याप कोणतीही कारवाई न केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भायखळा कारागृहातील प्रत्यक्षदर्शिनी सदर प्रकरणाची याचिका न्यायालयात दाखल करुनही तसेच सी.सी.टी.व्ही. फुटेज व इतर ठोस पुरावे असूनही शासन सर्व आरोपींना गुन्हे मुक्त करण्याचा प्रयत्न करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्व आरोपीपैकी किती आरोपींना जामिनावर मुक्त करण्यात आले आहे व कोणत्या आरोपींना न्यायाधीन बंदी म्हणून ठेवण्यात आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मंजूळा शेटे हत्येप्रकरणी सहा आरोपीच्या बचावासाठी मदत करण्याचे तक्रार असलेल्या श्रीम. स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक, पुणे यांच्या विरोधात चौकशी करण्यासाठी शासनाने दिनांक ०९/०८/२०१७ रोजीच्या शासन निर्णायान्वये एक सदस्यीय समिती गठीत केली गेली होती सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

महिला बंदी मंजुळा शेटे मृत्यू प्रकरणी खोटा शवविच्छेदन अहवाल देणाऱ्या डॉ. विश्वेश रोठे, अधिष्ठाता, सर ज.जी. समुह रुग्णालय, मुंबई यांना वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या शासन आदेश दिनांक ११/०८/२०१७ रोजी सेवेतून कमी करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.

सदर गुन्हयाच्या तपासात एकूण ९९ प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले असून त्यामध्ये ५ विदेशी महिला बंदी यांचे कलम १६४ फौजदारी दंड प्रक्रीया संहिता अन्वये मा.महानगरदंडाधिकारी यांचे समक्ष जबाब नोंदविण्यात आले आहे.

गुन्हयाच्या घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज व इतर ठोस सबळ पुराव्यांच्या आधारे (१) श्रीमती मनिषा गुलाब पोखरकर, तुरुंगाधिकारी श्रेणी-२, (२) श्रीमती बिंदु बाळकृष्ण नाईकवडे, महिला रक्षक, (३) श्रीमती आरती दिलीप शिंगणे, महिला रक्षक, (४) श्रीमती वसीमा युसुफ शेख, महिला रक्षक, (५) श्रीमती शितल वसंत शेगोकार, महिला रक्षक, (६) श्रीमती सुरेखा प्रसाद काकड, महिला रक्षक यांना या सर्व आरोपींविरोधी दिनांक २६/०९/२०१७ रोजी मा.अति.मुख्य महानगरदंडाधिकारी ३७ वे न्यायालय येथे विहित वेळेत दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. सदर खटला मा.सत्र न्यायालय, कोर्ट क्रमांक ४१, मुंबई येथे वर्ग करण्यात आला असून तो सेशन केस क्रमांक ६०४/२०१७ अन्वये सुनावणीसाठी आहे.

(३) भायखळा कारागृहातील मंजुळा शेटे मृत्यू प्रकरणी (१) श्रीमती मनिषा गुलाब पोखरकर, तुरुंगाधिकारी श्रेणी-२, (२) श्रीमती बिंदु बाळकृष्ण नाईकवडे, महिला रक्षक, (३) श्रीमती आरती दिलीप शिंगणे, महिला रक्षक, (४) श्रीमती वसीमा युसुफ शेख, महिला रक्षक, (५) श्रीमती शितल वसंत शेगोकार, महिला रक्षक, (६) श्रीमती सुरेखा प्रसाद काकड, महिला रक्षक यांना अटक करण्यात आली असून सर्व आरोपी यांना ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे न्यायाधीन बंदी म्हणून ठेवण्यात आलेले आहे.

उक्त आरोपीतांपैकी श्रीम.नाईकवडे, श्रीम.शेख व श्रीम.काकड यांनी जामिन मिळण्यासाठी मा.सत्र न्यायालय, मुंबई येथे अर्ज केला होता, तथापि सदर अर्ज मा.शहर सत्र न्यायालयाने नामंजूर केले आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील अस्थायी सफाई कामगारांच्या विविध मागण्यांबाबत

**(२८) * ३४९८५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील अस्थायी रोजंदारीवर कार्यरत असलेल्या सफाई कामगारांना दिनांक १ जून, २००० रोजीच्या नगर विकास विभागाच्या आदेशानुसार सेवाज्येष्ठता, अनुकंपातत्व व वारसा हक्काचा लाभ मिळण्यासाठी श्रमजीवी रयत कामगार संघटनेने मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १४ व २६ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) याच विषयाबाबत यापुर्वी अध्यक्षा, रयतराज कामगार संघटना यांच्या दिनांक १८/०६/२०१६ च्या निवेदनाच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून, त्यानुषंगाने पुढील कार्यवाही विचाराधीन आहे.

-----------------

## मौजे विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील आदिवासींच्या जागेवरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(२९) * ३५३२२ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील स्थानिक मुळ आदिवासी यांचे जागेतील सर्व्हे नं. ८६ हिस्सा नं.१/२, १/४, १/५ व १/१२ या जागेवर अनधिकृत इमारतींचे बांधकाम करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक मुळ आदिवासींच्या जमिनीवर अनधिकृत इमारतींचे बांधकाम करण्यात येत असल्याबाबत शासनाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासींच्या जागेवर झालेले अनधिकृत बांधकाम निष्कासीत करून मुळ जमीन मालकांना न्याय मिळूवन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील चंदनसार फुलपाडा येथील सर्व्हे नं. ८६ हिस्सा नं. १/२, १/४, १/५ व १/१२ या आदिवासी मिळकतीवर महानगरपालिकेमार्फत रघुवीर अपार्टमेंट, साई ज्योती, माऊंट मेरी स्कुल, बालाजी, बद्री विशाल भवन, महालक्ष्मी इ. २५ अनधिकृत इमारतीचे व शाळेचे बांधकाम केल्याप्रकरणी महानगरपालिकेकडून एम.आर. टी.पी. कायद्याअंतर्गत दिनांक ५ जून, २०१७ रोजी २० नोटीसा, दिनांक ०६/०६/२०१७ रोजी १ व दिनांक ०३/१०/२०१७ रोजी ८ नोटीसा अशा एकूण आजतागायत वसई-विरार शहर महानगरपालिकेने २९ मालमत्तावर नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे.

(२) व (३) होय.

महसूल व आदिवासी विभागाकडे तसेच जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाली होती.

तदनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

यांप्रकरणी वसई विरार शहर महानगरपालिकेने अनधिकृत इमारतींना महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमा अंतर्गत नोटीसा बजाविल्या आहेत.

तसेच सदर प्रकरणी आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना १५ दिवसात गुन्हे दाखल करण्याची सुचना देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुही (जि.नागपूर) नगरपंचायत अंतर्गत विद्युत साहित्य खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३०) * ३५४८३ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुही (जि.नागपूर) नगरपंचायत अंतर्गत विद्युत साहित्य खरेदीत गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर व मा.मुख्यमंत्री यांना कुही विकास मंच यांनी दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणातील दोषींवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कुही नगरपरिषदेंतर्गत एप्रिल, २०१६ मध्ये निविदा मागवून करण्यात आलेल्या विद्युत साहित्य खरेदीत अनियमितता झाल्याची तक्रार “सचिव, कुही विकास मंच” यांनी दिनांक २९/०५/२०१७ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे केली आहे.

(३) याबाबत प्राथमिक चौकशी पूर्ण करून अहवाल शासनास सादर करण्यास जिल्हाधिकारी, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पैठण (जि.औरंगाबाद) शहरात आपेगांव प्राधिकरणांतर्गत कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत

**(३१) * ३५१९५ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण (जि.औरंगाबाद) शहरात आपेगांव प्राधिकरणांतर्गत करण्यात येत असलेली कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामांच्या दर्जाचा आढावा घेवून याची जबाबदारी असलेल्या व कंत्राटदार यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पैठण आपेगांव प्राधिकरणास मंजूर केलेल्या निधीमधून करण्यात येणाऱ्या कामांपैकी सार्वजनिक बांधकाम विभाग या कार्यान्वयन यंत्रणेमार्फत करण्यात येणाऱ्या काही रस्त्यांची कामे गुणवत्ता मानकाप्रमाणे झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे.
(२) मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी याबाबत जबाबदार एकूण १० अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द प्रारुप दोषारोप पत्र सार्वजनिक बांधकाम विभागास सादर केले आहे. याबाबतची पुढील कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे.

या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत दाखल चौकशी प्रगतीत असल्यामुळे कंत्राटदारावर अद्याप स्वतंत्रपणे कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाहीत.

-----------------

## मुंबईतील वाकोला विभागातील महापालिकेच्या शाळांची क्षमता वाढविणेबाबत

**(३२) * ३५७४२ श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाकोला विभागात वाकोला व नारियलवाडी येथे महानगरपालिकेच्या दोन शाळा सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दोन्ही शाळा या इयत्ता ८ वी पर्यंत असल्याने पुढील शिक्षण घेण्याकरिता येथील विद्यार्थ्यांना खाजगी शाळांमध्ये प्रवेश घ्यावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी शाळांचा खर्च विद्यार्थ्यांच्या पालकांना परवडत नसल्याने विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत असल्याने उपरोक्त दोन्ही शाळांची क्षमता इयता १० वी पर्यंत वाढविणेसंदर्भात लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वाकोला विभागातील वाकोला मनपा शाळेत मराठी, हिंदी, तेलगु व कन्नड माध्यमाचे इयत्ता ७ वी पर्यंतचे वर्ग असून, उर्दु माध्यमाचे इयत्ता ८ वी पर्यंतचे वर्ग आहेत.

तसेच, नारियलवाडी मनपा शाळेत मराठी व तमिळ माध्यमाचे इयत्ता ७ वी पर्यंतचे वर्ग व हिंदी माध्यमाचे इयत्ता ८ वी पर्यंतचे वर्ग आहेत.

(३) सदर शाळांची क्षमता इयत्ता १० वी पर्यंत वाढविणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ रोजी पत्रव्यवहार केला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(४) वाकोला व नारियलवाडी महापालिका शाळेत सद्य:स्थितीत वर्गखोल्या उपलब्ध नसल्याने इयत्ता १० वी पर्यंतचे वर्ग वाढविणे शक्य नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

तथापि, बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार, २००९ या कायद्यातील निकषानुसार, वाकोला व नारियलवाडी मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना पटुक हिंदी टेक्निकल हायस्कुल, पब्लिक हिंदी हायस्कुल, कलिना माध्यमिक मनपा, सांताक्रुझ उर्दु मनपा, प्रभात कॉलनी मराठी मनपा, खेरनगर हिंदी, मराठी, इंग्रजी मनपा या शाळांमध्ये पुढील शिक्षणासाठी प्रवेश दिला जातो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नायगाव (जि.नांदेड) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुन्हेगारी रोखण्याबाबत

**(३३) * ३५५५३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरटयांनी धुमाकूळ घातला असून गडगा येथे एका घरातील कपाटातून ७० हजारांची रोख रक्कम चोरली असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चोरटयांनी काही दिवसापूर्वी रातोळी, मंजिरम या ठिकाणी धाडसी चोऱ्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गडगा येथे दिवसरात्र अवैधरित्या खुलेपणाने दारुची अवैध विक्री सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन चोरटयांना जेरबंद करण्याबाबत तसेच येथील अवैध दारुविक्री रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस स्टेशन नायगाव हद्दीतील गडगा या गावात माहे जुलै, २०१७ या महिन्यात चोरी संबंधाने कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसुन, गुन्हा दाखल नाही.

(२) रातोळी व मांजरम या ठिकाणी घरफोडी करुन, चोरी केलेच्या घटना घडल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) रातोळी, जिल्हा नांदेड येथील चोरी प्रकरणी पोलीस स्टेशन, नायगाव येथे गु.र.नं. १२४/२०१७ भा.दं.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे दिनांक २५/०७/२०१७ रोजी तर, मांजरम, जिल्हा नांदेड येथील चोरी प्रकरणी पोलीस स्टेशन, नायगाव येथे गु.र.नं. १२७/२०१७ भा.दं.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे दिनांक ०३/०८/२०१७ रोजी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस स्टेशन, नायगाव हद्दीतील गडगा येथे देशी/ विदेशी दारु ताब्यात बाळगल्या प्रकरणी सन २०१७ मध्ये आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई), अन्वये एकूण ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच अवैध दारुची चोरटी विक्री करणाऱ्या एका आरोपीविरुध्द पो.स्टे. नायगाव येथे चॅप्टर केस क्र. ०८/२०१७ कलम ११० (इ)(ग) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये व चॅप्टर केस क्र. १२/२०१७ कलम ९३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## कोपरी ठाणे (पूर्व) येथील महापालिका परिवहन सेवेच्या बसस्थानकाच्या दुरवस्थेबाबत

**(३४) * ३४७६१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे पूर्वेकडील कोपरी येथे सन १९९६ मध्ये ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेचे बसस्थानक सुरु करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या स्थानकातून अन्य साध्या बसेससह आलिशान वातानुकूलित बस सेवा सुरु असून त्यापासून प्रतिदिन ६ ते ७ लाख रुपयांचे उत्पन्न ठाणे परिवहन सेवेस मिळत असल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असताना या बसस्थानकात मोडकळीस आलेले बस थांबे, गलिच्छ अवस्थेतील स्वच्छतागृहे व त्यातील मलमुत्र तेथील रस्त्यावर वाहत जात असल्याने होणारी दुर्गंधी, तुटलेले छप्पर व खड्डे व्याप्त परिसर अशी या बसस्थानकाची दुरवस्था झाल्याच्या तक्रारी प्रवाशांनी ठाणे महापालिका, उपायुक्त (परिवहन), मा.सभापती, परिवहन समिती, ठाणे महानगरपालिका तसेच प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग यांचेकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केल्या असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) होय, असे निवेदन प्राप्त झाले आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या कोपरी बस स्थानकाजवळील झाड बस स्थानावर कोसळल्याने बस स्थानक व त्यावरील पत्र्याचा काही भाग व त्यालगतच्या भिंतीचा काही भाग तुटला आहे. तसेच यामुळे बस थांब्याजवळील स्वच्छतागृहाची मलवाहिनी फुटली होती.

तथापि, ठाणे महानगरपालिकेने कोपरी येथील बस स्थानकातील तुटलेल्या मलवाहिनीची तात्पुरती डागडुजी करण्यात आली असुन पुढील उपाययोजना करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे :-

- उपरोक्त कोसळलेली भिंत बांधण्यात येत आहे.
- प्रवासी निवाऱ्यामधील तुटलेली क्यु रेलिंगची दुरुस्ती करण्यात येत आहे.
- प्रवासी निवाऱ्यावरील तुटलेले पत्रे नव्याने बसविण्यात येत आहेत.
- नियंत्रण चौकीमधील शौचालयाची दुरुस्ती करण्यात येत आहे.
- मलमुत्रवाहीनी नव्याने टाकण्यात येत आहे.
- कर्मचाऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाथरी (जि.परभणी) येथील श्री.साईबाबांच्या जन्मभूमी विकास आराखडयाबाबत

**(३५) * ३५४५४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३३८२८ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील श्री.साईबाबा यांच्या जन्मभूमी विकास आराखडयास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी व इतर यंत्रणांनी त्रुटींची पुर्तता करून सदरील आराखडा प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शासन निर्णय, नियोजन विभाग दिनांक ०४/०६/२०१५ नुसार क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही सुरु आहे. तथापि श्री साईबाबा यांच्या जन्मभूमीचे महत्व लक्षात घेता शासनाने दिनांक २०/११/२०१७ च्या शासन निर्णयान्वये पाथरी नगरपरिषदेस वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत रुपये २ कोटी इतका निधी उपलब्ध केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील स्वयंचलित हवामान केंद्रातील उपकरणे चोरीला गेल्याबाबत

**(३६) * ३५७४० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरमध्ये शेतकऱ्यांना हवामानाचा अचूक अंदाज मिळावा याकरिता स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यात आले होते परंतु पाच महिन्यांत येथील उपकरणे चोरीला गेली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वयंचलित हवामान केंद्रातील उपकरणे चोरीला गेल्याने शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून याप्रकरणी गुन्हा नोंदवून किती जणांना अटक करण्यात आली आहे,

(३) असल्यास, स्वयंचलित हवामान केंद्र पुन्हा नव्याने सुरु करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणी दिनांक १८/०९/२०१७ च्या रात्री पुर्वी कोणीतरी अज्ञात इसमाने स्वयंचलित हवामान संचातील अंदाजे १०,५००/- रूपयाची सौर उर्जा प्लेट, बॅटरी व लाईट हे साहीत्य चोरून नेल्याने पोलीस स्टेशन, हिंगणा येथे अज्ञात आरोपीविरूध्द अपराध क्रमांक ३७१/१७ भादंवि कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

(३) स्वयंचलित हवामान संचातील बॅटरी साहित्य लावून उपकरण सुरू करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) शहराच्या मध्यवर्ती भागांमधून जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३७) * ३५९५१ श्री.परिणय फुके, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहराच्या मध्यवर्ती भागामधून थेट शहराबाहेर जाण्या-येण्यासाठी असलेल्या अंबरनाथ-चिंचपाडा-नालिंबी या रस्त्याचे सिमेंट डांबरीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असून सदर रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर मोठे खड्डे पडून मोठ्या प्रमाणात जिवित व वित्तहानी झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

अंबरनाथ नगरपरिषद हद्दीमधील शहराच्या मध्यवर्ती भागामधून जाणारा अंबरनाथ-चिंचपाडा-नालिंबी रस्ता आवश्यक त्या ठिकाणी ८० % सिमेंटचा असून उर्वरित २० % भाग डांबरीकरणाव्दारे पुर्ण झाला आहे. सद्य:स्थितीत सदरचा रस्ता वाहतूक योग्य असून वाहतूक सुरळीत असल्याचे अंबरनाथ नगरपरिषदेने कळविले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात महा-ई-सेवा केंद्रामार्फत नि:शुल्क देण्यात येणाऱ्या दाखल्यांचे दर आकारण्यात येत असल्याबाबत

**(३८) * ३५०३२ श्री.हरिसिंग राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ३४११५ ला दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात महा-ई सेवा मार्फत विविध शासकीय दाखले देण्यात येत असून आधार कार्ड, शेतकऱ्यांचे कर्ज माफीचे अर्ज भरणे ही सेवा नि:शुल्क देण्याचे शासनाचे आदेश असतांनाही नागरीकांकडून त्याचे दर आकारले जात असल्याच्या तक्रारी केळापूर व पुसद तालुक्यातील नागरिकांनी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील महा-ई सेवा मार्फत नि:शुल्क देण्यात येणारे दाखल्यांचे दर आकारणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

तसेच, अशा प्रकारच्या तक्रारींवर पुर्व उपाययोजना म्हणून या विभागाच्या दिनांक २७ जुलै, २०१६ च्या शासन पत्रान्वये दोषींविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याच्या व आवश्यकता भासल्यास फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांच्या केंद्राचे परवाने रद्द करण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकारी यांना दिलेल्या आहेत.

-----------------

## कुर्डुवाडी (जि.सोलापूर) येथील जलशुध्दीकरण यंत्रणा बंद असल्याबाबत

**(३९) * ३५४९६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्डुवाडी (जि.सोलापूर) येथील जलशुध्दीकरण यंत्रणा अनेक कारणांनी बंद पडल्याने शहराला गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्यामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यासाठी येथील जलशुध्दीकरण केंद्रात नव्याने साहित्य बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशी कोणतीही बाब निदर्शनात आली नाही.

कुर्डुवाडी शहरातील जलशुध्दीकरण यंत्रणा सुस्थितीत असून जलशुद्धीकरण केंद्रातील पाण्याचे ॲलम (पाण्याची तुरटी) व क्लोरीन गॅस वापरून शुद्धीकरण व निर्जंतुकीकरण करून शहरास शुध्द पाण्याचा पुरवठा केला जातो. तसेच वितरित केलेल्या पाण्याच्या नमुन्यांची जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेत नियमितपणे तपासणी करून पाणी पिण्यास योग्य असल्याबाबत खात्री केली जाते.

(२) सदर जलशुध्दीकरण केंद्रातील यंत्रणा सुस्थितीत असल्याने नव्याने साहित्य बसविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिकेच्या कर पध्दतीबाबत

**(४०) * ३५५५४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेने सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ पर्यंत लावलेला कर हा दिनांक ३ एप्रिल, २०१७ रोजीच्या सर्वसाधारण सभेमधील ठराव क्रमांक ५ अन्वये लावलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३ एप्रिल, २०१७ रोजीच्या सभेमध्ये ठराव क्रमांक ५ मध्ये महानगरपालिकेने रिटेबल किंवा कॅपिटल या दोनपैकी एका पध्दतीने कर लावणे आवश्यक असतानाही सदर महानगरपालिकेने कर लावलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर लावताना एका खाजगी कंपनीला सर्वेक्षण करण्याचे कंत्राट देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२७ नुसार मालमत्ता कर आकारणीचे अधिकार महानगरपालिकेस आहेत.

सर्व मालमत्तांवर त्यांच्या क्षेत्रफळानुसार कर आकारणी होण्याच्या अनुषंगाने, महापालिकेने शहरातील सर्व मालमत्तांची जीआयएस मॅपींगद्वारे अचूकरित्या मोजणी करण्याचा निर्णय सन २०१६ मध्ये घेतला होता.

शहरातील मालमत्तांची मोजणी केल्यांनतर महानगरपालिकेची आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याच्यादृष्टीने महानगरपालिकेने सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या कालावधी करीता महासभेने ठरवून दिलेल्या वाजवी भाडेदरानुसार कर आकारणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

(३) व (४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार कर आकारणी करण्याचा अधिकार महानगरपालिकेस असून महानगरपालिकेचे आर्थिक हित विचारात घेवून निर्णय घेतला आहे.

तसेच महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांचे जीआयएस मॅपींग करुन प्रत्यक्ष मालमत्तांचे मोजमाप घ्यावयाच्यादृष्टीने सर्वेक्षण करण्यासाठी विहीत प्रक्रियेचा अवलंब करुन खाजगी संस्थेस सदर काम देण्यात आले असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आचार्य विनोबा भावे यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(४१) * ३४७२४ श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांचे आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्मारक त्यांच्या जन्मभूमीत गोगादे बुद्रुक (ता.पेण) येथे उभारण्याचा निर्णय शासनाने सन १९९२ मध्ये घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्मारकाचे दोन वेळा भूमीपूजन होऊनही मागील २५ वर्षापासून स्मारक उभारण्याचे दृष्टीने कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.
(२), (३) आणि (४) मौजे गागोदे बुद्रुक, ता.पेण येथील प्रस्तावित स्मारकाच्या एकूण १३ कामांपैकी तळ्याचे सुशोभिकरण करण्याबाबतचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामांबाबत नव्याने वास्तूशास्त्रीय आराखडे व अंदाजपत्रक तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

-----------------

## मुंबई येथील सायन किल्ल्याच्या दूरवस्थेबाबत

**(४२) * ३५२२९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील सायन किल्ल्याची संरक्षक भिंत कोसळली असून येथे गर्दुले आढळून येत असून अनेक अनैतिक धंदे सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सायन तलावाला सुरक्षा नसल्यामुळे या तलावाचा वापर कचरा टाकण्यासाठी होत असून सदर तलावात अनेकांनी आत्महत्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या किल्ल्याच्या संरक्षक भिंतीची दुरुस्ती करण्याबाबत तसेच सदर दोन्ही ठिकाणी सुरक्षारक्षक नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सायन किल्ल्याची संरक्षक भिंत कोसळली आहे ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, गृह विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, सायन किल्ल्यात गर्दुले व अनैतिक धंदे सुरु असल्याचे आढळून आले नाही.

(२) सायन तलावाच्या सभोवतालच्या परिसरात दारोदारी जाऊन कचरा गोळा करणे व वाहून नेण्याची व्यवस्था बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.

सदर तलावाच्या परिसरात दोन ठिकाणी सार्वजनिक कचराकुंडीची व्यवस्था करण्यात आली आहे.

सदर तलावात मागील दोन वर्षांत एका व्यक्तीने आत्महत्या केली आहे ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) सायन किल्ल्याच्या संरक्षणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

- सदर किल्ल्यातील सायन तलावाच्या तीन बाजूस संरक्षक भिंत असून, उर्वरित रस्त्याकडील बाजूस संरक्षक जाळी बसविण्यात आली आहे.
- सदर तलावाच्या दर्शनी भागावर तलावाच्या खोलीबाबत व तलावात उतरल्यास होणाऱ्या दुर्घटनेबाबत सूचना फलक लावण्यात आला आहे.
- कोसळलेल्या संरक्षक भिंतीची दुरुस्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.
- महानगरपालिकेचे सुरक्षारक्षक तीन पाळयांमध्ये तैनात असतात.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील यंत्रमाग कामगारांना ईपीएफची योजना लागू करण्याबाबत

**(४३) * ३६५४३ श्री.तानाजी सावंत, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील सर्व यंत्रमाग धारकांनी ईपीएफची योजना लागू करण्यास विरोध दर्शविल्यामुळे यंत्रमागावर काम करणाऱ्या गरीब कामगारांनी आपल्या न्याय हक्कासाठी वेगवेगळया कामगार संघटनामार्फत माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सनदशीर मार्गाने आंदोलने केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंत्रमाग बंद झाल्यामुळे सुमारे ४२ हजारांपेक्षा अधिक यंत्रमाग कामगार बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील अनेक वर्षापासून अल्प वेतनात काम करणाऱ्या उक्त यंत्रमाग कामगारांना ईफीएफची योजना सुरु करण्यास संबंधित कारखानदारांना शासनाकडून काही सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून ही योजना लागू न करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करुन यंत्रमाग कामगारांचा प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय.

(२) सोलापूर जिल्ह्यातील यंत्रमागधारकांनी ई.पी.एफ. योजना लागू करण्याविरुध्द दिनांक १७/०८/२०१७ ते दिनांक २१/०८/२०१७ व दिनांक ०७/१०/२०१७ ते दिनांक २६/१०/२०१७ या कालावधीत कारखाने बंद ठेवल्याने तात्पूरत्या कालावधीसाठी रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला होता. तथापि, दिनांक २७/१०/२०१७ पासून बंद पुकारलेले यंत्रमाग कारखाने पूर्ववत सुरू झाले आहेत.

(३) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ हा केंद्रीय कामगार कायदा असुन त्याची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या श्रम एवं रोजगार मंत्रालयामार्फत केली जाते.

सदर बाबतीत केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय आयुक्त, भविष्य निर्वाह निधी कार्यालय, सोलापूर यांनी ३०० यंत्रमागधारकांना उक्त अधिनियमांतर्गत नोंदणी करण्याचे निर्देश दिले असल्याचे त्यांच्या दिनांक २४/११/२०१७ च्या ई-मेल अन्वये कळवले आहे.

(४) क्षेत्रिय भविष्य निर्वाह निधी सोलापूर यांचेमार्फत यंत्रमाग आस्थापनांची तपासणी व चौकशी करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरीय रेल्वे पोलिसांच्या मंजूर पदामध्ये वाढ करण्याबाबत

**(४४) * ३४७१८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरीय रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेची धुरा वाहणाऱ्या लोहमार्ग पोलिसांच्या मनुष्यबळानुसार सन १९८२ पासून मंजूर पदामध्ये वाढ झालेली नाही त्यामुळे कार्यरत पोलीस कर्मचाऱ्यांवर ताण पडत असल्याने पोलीस आयुक्त, लोहमार्ग यांनी राज्य शासनाकडे अहवाल पाठवून मंजूर पदांमध्ये वाढ करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर पदामध्ये वाढ न करण्याची कारणे काय आहेत तसेच मंजूर पदामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सन १९८२ पासून पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई यांच्या आस्थापनेवरील मनुष्यबळामध्ये शासनाने वेळोवेळी वाढ केलेली असून सन १९८२ ते सन २०१४ या कालावधीमध्ये एकुण १९४७ इतके वाढीव मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सद्यस्थितीत पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांच्या आस्थापनेवर एकुण ४०१९ इतके मनुष्यबळ मंजूर आहे. तसेच याव्यतिरिक्त लोहमार्ग पोलिसांच्या मनुष्यबळात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध कारागृहातील जामिन मंजूर झालेल्या कैद्यांची सुटका करण्याबाबत

**(४५) * ३५८७४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध कारागृहात जामिन मंजूर होवून देखील बंदिस्त असलेल्या ७५० कच्च्या कैद्यांची रितसर सुटका करण्यासाठी कारागृह विभागानेच पुढाकार घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा उपक्रम सुरुवातीला मुंबई, नवी मुंबई व ठाणे येथे राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या या उपक्रमांतर्गत सदर कैदयांची सुटका झाल्यास पुन्हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे शासनाने सदर कैद्यांची सुटका केल्यास त्यांच्यावर नियमित देखरेख ठेवण्याबाबत कोणती यंत्रणा निर्माण केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे,

सन्मा. उच्च न्यायालय याचिका क्र.४६/१५ सह १६७/१५ सह (९/१७) मध्ये दिनांक ०१/०३/२०१७ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मा.उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसमावेशक सुधारणा सुचविणेसाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. राज्यातील विविध कारागृहात ७ वर्षाखालील कमाल शिक्षा होऊ शकते अशा बंद्याचे प्रकरणी जामीन मंजूर होऊन देखील बंदिस्त असलेल्या ५८९ बंदयाची माहिती समितीकडे सादर केली आहे.

सर्व कारागृहातील माहिती समितीस सादर केलेली असून टाटा ट्रस्ट व महाराष्ट्र राज्य यांचेकडील सामंजस्य करारानुसार जामीन मंजूर झालेल्या बंदयाचे जामिन पूर्ततेकामी योग्य ती मदत घेऊन तळोजा, येरवडा, औरंगाबाद, नागपूर व नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात उपक्रम राबविण्यात येत आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय रिट पिटीशन क्र.४०६/२०१३ मधील निर्देशानुसार न्यायाधीन बंदी पुनर्विलोकन समिती स्थापित झाली असून त्यांचेसमोर तीन महिन्यातून एकदा न्यायाधीन बंदयांची प्रकरणे मुक्ततेकरीता सादर करण्यात येत आहेत. तसेच सीआरपीसी ४३६ (A) अंतर्गत दाखल न्यायाधीन बंद्याचा देखील सदर समितीद्वारे आढावा घेण्यात येत आहे. सदर समितीमध्ये सत्र न्यायाधीश अध्यक्ष व जिल्हादंडाधिकारी, पोलीस आयुक्त/ अधिक्षक, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व कारागृह अधिक्षक हे सदस्य आहेत.

सदर समिती व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांना कमाल शिक्षेच्या ¼ कालावधी न्यायाधीन बंदी म्हणून झालेल्या बंदयांची यादी न्यायाधीन बंदी पुनर्विलोकन समिती व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांना केंद्रीय गृह मंत्रालयाच्या निर्देशाने सादर करणेबाबत सर्व कारागृहांना सूचना देण्यात आल्या आहेत व त्यानुसार सर्व राज्यातील कारागृहामध्ये सदर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) संबंधित सन्मा. न्यायालय विहीत अटी व शर्ती घालून बंदयास जामिन मंजूर करतात. बंदयाने जामिनाची पुर्तता केल्यानंतर बंदी कारागृहातून मुक्त होणार आहे. तसेच कारागृहातून मुक्त झालेल्या बंदयावर पोलीस विभागाकडून देखरेख ठेवण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महापालिकांमध्ये फेरीवाला धोरण अंमलात आणण्याबाबत

**(४६) * ३४९३४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने सन २००९ मध्ये फेरीवाल्यांच्या पुनर्वसनासाठी व नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी महानगरांना फेरीवाला धोरण तयार करण्याचे आदेश दिले होते व त्यानुसार सन २०१४ मध्ये फेरीवाला धोरण मा.राष्ट्रपती यांचे मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते मात्र त्यानुसार पुढील कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यातील महानगरपालिकामध्ये फेरीवाला क्षेत्र आरक्षित ठेवणे बंधनकारक असून त्यानुसार ठाणे महानगरपालिकेने राज्यात आदर्श ठरेल असे फेरीवाला धोरण तयार करुन दिनांक १५ ऑगस्ट, २०१७ पासून अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने राज्यातील सर्व महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांचे बायोमेट्रीक पध्दतीने सर्वेक्षण करुन फेरीवाला धोरण अंतिम करण्याचा निर्णय घेतल्यामुळे ठाणे महानगरपालिकेने तयार केलेल्या फेरीवाला धोरणाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित असल्याचे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील नागरिकांच्या सुसह्य रहदारीच्यादृष्टीने फेरीवाला धोरण राबविण्याबाबत तसेच ठाणे महानगरपालिकेने शासनाकडे सादर केलेल्या फेरीवाला धोरणाबाबत कोणता निर्णय घेतला आहे व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासनाने दिनांक १ मे, २०१४ पासून पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पथविक्रीचे विनियमन) अधिनियम २०१४ लागू केला आहे.
(२) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, ठाणे महानगरपालिकेमार्फत शहर फेरीवाला समिती गठीत करण्यात आली असून, फेरीवाला क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

सदर फेरीवाला क्षेत्रास समितीची मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.
(३), (४) व (५) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणांसह बायोमेट्रीक सर्वेक्षण करण्यात आले आहे.

तथापि, फेरीवाला धोरणाचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेमार्फत शासनास सादर करण्यात आलेला नसल्याने प्रलंबित असण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

फेरीवाला धोरण राबविण्याच्या अनुषंगाने पथविक्रेता (उपजीविका संरक्षण आणि पथविक्रीचे विनियमन)(महाराष्ट्र) योजना, २०१७ दिनांक ०९ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

-----------------

## पुणे महानगरपालिकेची आरोग्य सेवा सुधारण्याबाबत

**(४७) * ३५२६८ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या पर्यावरणाच्या सद्यस्थिती अहवालानुसार मागील ५ वर्षामध्ये शहरात मलेरिया, डेंग्यू, स्वाईन फ्लू, रेबीज, चिकनगुनिया व अन्य आजाराच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याचा निष्कर्ष काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिका आरोग्य सेवेसाठी दरवर्षी रुपये २०० ते ३०० कोटी खर्च करत असूनही शहरात विविध आजारांचे प्रमाण वाढत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार महापालिकेच्या आरोग्य सेवेतील कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई करुन शहरातील साथींच्या रोगांवर नियंत्रण मिळवून आरोग्य सेवा सुधारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ३१/७/२०१७ रोजी पुणे महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या पर्यावरण अहवालानुसार मागील ५ वर्षामध्ये स्वाईन फ्लू, डेंग्यू, चिकन गुनिया या आजारातील रूग्णांची संख्या वाढलेली आहे ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) अनियमित व दिर्घकाळ पावसामुळे किटकजन्य तसेच विषाणूजन्य आजारांचा प्रादुर्भाव पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात वाढला होता, ही वस्तुस्थिती आहे. तसेच याबाबत दिनांक ४/९/२०१७ रोजी बातमी प्रसिध्द झाली होती.

सदरच्या आजारावर प्रतिबंध करण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून वेळोवेळी खालील उपाययोजना करण्यात येतात :-

- साथीच्या रोगाचे नियमित सर्वेक्षण.
- किटकजन्य आजाराच्या प्रतिबंधासाठी नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
- किटकजन्य आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी किटकनाशक औषधांची फवारणी व धुम्रफवारणी.
- श्वासामार्फत प्रसारण होणाऱ्या विषाणूजन्य बाधित रूग्णांवर लक्षणाच्या वर्गीकरणानुसार उपचार.
- सार्वजनिक क्षेत्रातील आरोग्य अधिकारी व निम्न वैद्यकीय कर्मचारी व खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांना पावसाळा व त्यानंतर उद्भवणाऱ्या आजारांचे निदान, उपचार प्रतिबंध व नियंत्रण याबाबत प्रशिक्षण.

- साथीच्या रोगाच्या निदानासाठी आवश्यक प्रयोगशालेय सुविधा.
- औषध व इतर साधन सामुग्रीचा आवश्यक साठा.
- घनकचरा व्यवस्थापन, जल, अतिक्रमण, ड्रेनेज इत्यादी विभागांशी समन्वय.
- विविध जनसंपर्क माध्यमातून लोक प्रबोधन.
- डासोत्पत्तीस कारणीभूत व्यक्ती/संस्था यांना ही स्थाने नष्ट करण्यासाठी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.
- अतिजोखमीच्या व्यक्तींना मोफत एच-१ एन-१ लसीकरण करण्यात येते. तसेच रूग्णांना मोफत औषधे पुरविली जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) शहरात कामगार कल्याण भवन बांधण्याबाबत

**(४८) * ३४९६० श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३१२५३ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) शहरातील मौजे बारावे सर्व्हे क्र. ६२ वरील २२ गुंठे शासकीय भूखंड महसूल विभागाने पत्र क्र. जमीन-२७७२/प्र.क्र.४५/ज-४ नुसार माहे फेब्रुवारी, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान कामगार कल्याण भवन बांधण्यासाठी कामगार विभागास वर्ग केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भूखंड कामगार विभागाने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास "कामगार कल्याण भवन" 'बांधण्यासाठी उपलब्ध करून दिल्यानंतर मागील ४ वर्षात कामगार कल्याण मंडळाने सदरहू भूखंडाच्या सुरक्षा व संवर्धनासाठी या जमिनीवर कोणतेही बांधकाम अथवा संरक्षक भिंत देखील बांधलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगार कल्याण मंडळाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे आजमितीस सदरहू भूखंडावर पत्र्याचे कंपाउंड बांधून अतिक्रमण करण्यात आले असून सदरहू अतिक्रमण काढण्यासाठी कामगार कल्याण मंडळाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू भूखंडावर प्रस्तावित कामगार कल्याण भवन बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदरहू भूखंडावर कोणतेही अतिक्रमण झालेले नाही याची खातरजमा महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने केली आहे.
(४) व (५) सदरहू भूखंडावर कामगार भवन उभारण्यासंदर्भात ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासंदर्भात सूचना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास देण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या कामाचा आठवडा पाच दिवसांचा करण्याबाबत

**(४९) * ३५०५५ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३२२६८ ला दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासकीय कर्मचारी संघटना, राजपत्रित अधिकारी संघटना आणि शिक्षक भारती यांच्या मागणीच्या अनुषंगाने कामकाजाचा पाच दिवसांचा आठवडा करण्याबाबत शासनाने नेमलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यातील शिफारशींचा तपशील व शासनाचा निर्णय काय आहे,
(३) असल्यास, सर्व शासकीय, निमशासकीय कर्मचारी आणि प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षक यांना जागतिक मापदंडानुसार कामाचे तास, दिवस आणि पाच दिवसांचा आठवडा निश्चित करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(४) असल्यास, राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्य शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा करण्यासंदर्भात शासनाकडून कोणतीही समिती गठीत करण्यात आलेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघ व अन्य कर्मचारी संघटनांसोबत दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी आयोजित बैठकीमध्ये, सातवा वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करताना, केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी ५ दिवसांचा आठवडा लागू करण्याबाबत विचार करण्यात येईल असे ठरले आहे.
(४) याबाबत सर्व दृष्टीकोनातून अभ्यास करुन सर्वंकष अहवाल शासनाला सादर करण्यासाठी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये श्री.बी.सी.खटुआ, सेवानिवृत्त भा.प्र.से. अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य रस्ते विकास महामंडळाचे माजी व्यवस्थापकीय संचालक यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(५०) * ३५५०५ श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामराव वडकुते, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य रस्ते विकास महामंडळाचे माजी व्यवस्थापकीय संचालक यांच्यावर झालेल्या गैरव्यवहाराच्या आरोपांच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी माजी मुख्य सचिव जॉनी जोसेफ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ रोजी समिती नेमण्यात आलेली असून चौकशी अहवाल सादर करण्यासाठी समितीस दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व अहवालाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अहवालातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. दिनांक २९ ऑगस्ट,२०१७ रोजी माजी मुख्य सचिव जॉनी जोसेफ यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली आहे. चौकशी अहवाल सादर करण्यासाठी समितीला दिनांक ३०/११/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.
(२), (३) व (४) चौकशी समितीचा अहवाल शासनास नुकताच प्राप्त झाला असून सदर अहवाल पुढील कार्यवाहीसाठी शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## मुंबई मेट्रोच्या कारशेडसाठी जमीन संपादन करण्याबाबत

**(५१) * ३४९०४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत मेट्रोच्या कारशेडसाठी आरे येथील ३० हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देशभरातील विविध मेट्रो कारशेडला १० ते १२ हेक्टर जागा लागत असताना व दिल्लीतील सर्वात मोठया कारशेडला साडे सतरा हेक्टर जागा लागली असताना आरे येथील कारशेडसाठी ३० हेक्टर जागा देण्यामागील शासनाची भुमिका काय आहे,
(३) असल्यास, आरे येथील कारशेडची जागा ही वन विभागाची नसून ती डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाची आहे असे जाहिरातीत म्हटले असले तरी ती जागा वन विभागाचीच आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कारशेडसाठीची ३० हेक्टर जागा संपादित करुन सदरील जागा विकासकांच्या संगनमताने केलेल्या सुमारे १८ हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मेट्रो कारशेडकरिता आरे येथील ३० हेक्टर जमीन २२ ऑगस्ट, २०१४ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहे.
(२) मेट्रो कारशेडकरिता सर्वसाधारणपणे ०.९६ हेक्टर प्रति कि.मी. इतके क्षेत्र आवश्यक असते. त्यानुसार सदर ३३.५ कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्गिकेच्या कारशेडसाठी ३० हेक्टर जागा आवश्यक आहे.
(३) हे खरे नाही. सदरची जागा महाराष्ट्र शासनाच्या दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या मालकीची होती.
(४) हे खरे नाही, कार शेडसाठीचे आरक्षित क्षेत्र केवळ कार दुरुस्ती व देखभाल आगार यासाठीच वापर करण्यास देण्यात आलेले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान योजनेबाबत

**(५२) * ३५७७२ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झोपडपट्ट्या व गलिच्छ वस्त्यांमध्ये स्थानिक सहभागातून स्वच्छता करण्यासाठी महापालिकेकडून "स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान" योजना राबविली जात असून जनजागृतीसाठी मोठया प्रमाणात निधी दिला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेमध्ये झोपडपट्टीतील १५० कुटुंबांचा कचरा उचलण्यासाठी मंडळाच्या एका कामगाराला सफाईच्या साहित्यासह ५४००/- रुपये व रहिवाश्यांच्या प्रबोधनासाठी रुपये ६०० दिले जात असून एवढ्या तुटपुंज्या पगारामध्ये कामगाराला सफाई व प्रबोधन करणे शक्य नसल्यामुळे ही योजना अपयशी ठरली असून जनजागृती मोहिमेसाठी दिला जाणारा निधी वाया जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदाराकडून अनुदानाची रक्कम वाढताच कामगारांची संख्या जास्त दाखवून अनुदानातील रक्कम लाटण्याचा प्रकार सुरु झाल्याने ही योजना बंद करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, मुंबईतील झोपडपट्ट्या, गलिच्छ वस्त्यांमध्ये स्थानिक सहभागातून स्वच्छता करण्यासाठी महापालिकेकडून “स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान” योजना राबविली जात असून, याअंतर्गत प्रबोधन, लोकसहभाग, जनजागृती, वातावरण निर्मिती इत्यादी बाबींकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून निधी दिला जातो.
(२) व (३) स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ७५० लोकसंख्या किंवा १५० कुटुंबे म्हणजे एक “एकक” असे प्रमाण ठरविण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक स्वच्छता राखण्यासाठी संस्थेला लागणारे साहित्य व अवजारे यांची खरेदी, स्वयंसेवकांसाठी सुरक्षा साधने, दैनंदिन स्वच्छता, पर्यवेक्षण आणि व्यवस्थापन खर्च याकरिता रुपये ५४००/- प्रति एकक प्रतिमाह व प्रबोधन व जनजागृतीसाठी रुपये ६००/- प्रति एकक प्रतिमाह असे एकूण रुपये ६०००/- प्रति एकक प्रतिमाह इतके सहाय्य अनुदान स्वरुपात देण्यात येते.

सदर योजनेमध्ये स्थानिक स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून लोकसहभागासाठी जनजागृती करणे अपेक्षित आहे. याकरिता संस्था, स्थानिक जनतेतून स्वयंसेवक तयार करते व लोकसहभागातून योजनेच्या ध्येयांची पुर्तता करते.

सदर योजनेद्वारे गलिच्छ वस्त्यांमध्ये साफसफाई राखली जात असल्यामुळे दिला जाणारा निधी वाया जात नाही.

सदर योजना बंद करण्यात आली नाही. तसेच, सदर योजनेमध्ये उद्दिष्टपूर्तीसाठी कामगार पुरविण्याची संकल्पना / तरतुद नसून, “एकक” या संकल्पनेशी निगडीत आहे.

सदर योजनेचे पुनर्विलोकन करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

-----------------

## म्हाडाने उभारलेल्या व्यावसायिक दुकानांची निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत

**(५३) * ३४६७२ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण, म्हाडा व कोकण गृहनिर्माण व मुंबई गृहनिर्माण मंडळाने विविध ठिकाणी उभारलेल्या वसाहतींमध्ये तसेच विरार, बोळींज, गोरेगाव, मालवणी, पवई व प्रतिक्षानगर इत्यादी ठिकाणी व्यावसायिक दुकाने बांधली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी विक्रीसाठी प्रत्येकी किती दुकाने बांधण्यात आली आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त विविध ठिकाणी उभारलेल्या व्यावसायिक दुकानांची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार सदर दुकानांची विक्री करण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वसाहतीत २१३ दुकानी गाळे बांधण्यात आलेले आहेत. तर कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळांतर्गत विरार-बोळींज प्रकल्पामध्ये एकूण ५७ दुकाने बांधण्यात आली आहेत.

अशा प्रकारे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ व कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत एकूण २७० दुकाने बांधून तयार आहेत. तर वेंगुर्ला येथील प्रकल्पामध्ये एकूण २० दुकाने बांधण्यात येत आहेत.
(३) हे अंशत: खरे आहे.

मुंबई व कोकण या दोन्ही गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वर नमुद बांधण्यात आलेल्या दुकांनाची विक्री करण्यासाठी निविदांची प्रक्रिया चालू आहे.
(४) व (५) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दुकानी गाळ्यांपैकी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त १०८ दुकानी गाळ्यांच्या विक्रीकरिता निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विरार बोळींज येथील दुकानांची विक्री करण्यासाठी निविदांची प्रक्रिया चालू आहे.

तथापि, वेंगुर्ला येथील योजनेतील इमारतींचे काम प्रगतीपथावर आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर दुकानांची विक्री करण्यासाठी निविदांची प्रक्रिया कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत राबविण्यात येईल.

-----------------

## ठाणे शहरात शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात अंमली पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(५४) * ३५५५२ श्री.जयंत पाटील, श्रीमती स्मिता वाघ, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात अफू, गांजा, एमडी अशा अंमली पदार्थांची सर्रास विक्री करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे शहरात हुक्का पार्लर आणि पोपट पानातून मादक पदार्थांची विक्री पान टप-यांवर केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिसरातील मुलांच्या पालकांनी “आमच्या मुलांना या व्यसनाच्या विळख्यातून बाहेर काढा” अशी विनंती करणारी अनेक पत्रे पोलिसांना देऊन देखील त्यावर अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर या पथकामार्फत ठाणे शहर व आजुबाजुचे परिसरात अंमली पदार्थ गांजा, अफु, एमडी व इतर अंमली पदार्थांची विक्री वाहतूक व साठवणूक करणाऱ्या इसमाविरुद्ध वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली असून जानेवारी २०१७ पासून एनडीपीएस कायद्याच्या कलमांखाली खालीलप्रमाणे पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) ठाणेनगर पोलीस स्टेशन | : | २ |
| २) कासारवडवली पोलीस स्टेशन | : | २ |
| ३) वागळे इस्टेट पोलीस स्टेशन | : | १ |
| ४) श्रीनगर पोलीस स्टेशन | : | १ |
| ५) मुंब्रा पोलीस स्टेशन | : | ३ |
| ६) कळवा पोलीस स्टेशन | : | २ |
| ७) चितळसर पोलीस स्टेशन | : | १ |
| ८) वर्तकनगर पोलीस स्टेशन | : | १ |
| एकूण | : | १३ |

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पोलीस पाटलांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत

**(५५) * ३५१७८ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस पाटलांच्या मानधनात रुपये १५ हजारापर्यंत वाढ करावी, हंगामी पोलीस पाटलांना कायम करावे, सेवानिवृत्तीनंतर वारसास सेवेत सामावून घ्यावे, निवृत्तीवेतन देण्यात यावे, सेवेची कालमर्यादा ६० वरून ७० वर्ष करावी व राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सोयी-सुविधा मिळाव्यात इत्यादी मागण्या महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील असोशिएशन तर्फे शासन व लोकप्रतिनिधींकडे सातत्याने करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पोलीस पाटलांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पोलीस पाटील, कोतवाल, अंगणवाडी सेविका इ. मानसेवी कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याकरीता “एकछत्र योजना” तयार करण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८/०३/२०१७ च्या शासन निर्णयान्वये एक अभ्यासगट नेमण्यात आला आहे. सदर अभ्यासगटाच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्यानंतर पोलीस पाटलांच्या मानधन व अन्य सोयीसवलतींबाबत गृह विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येच्या तपासाबाबत

**(५६) * ३५९८१ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड : तारांकित प्रश्न क्रमांक ३३४२० ला दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अंधश्रध्दा निर्मुलनाचे महत्त्वाचे कार्य करणारे डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येला चार वर्षाहून अधिक कालावधी होऊनही त्यांच्या मारेकऱ्यांचा शोध घेण्यास शासनाकडून जाणिवपूर्वक टाळाटाळ करण्यात येत असल्याचा संशय जनमानसात निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मारेकऱ्यांचा तातडीने शोध घेण्याबाबत तसेच त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येच्या अनुषंगाने डेक्कन पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १५४/२०१३ भादंवि कलम ३०२, ३४ शस्त्र अधिनियम ३(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. ७/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ९/५/२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर गुन्हयाचा तपास दिनांक ३/६/२०१४ रोजी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सी.बी.आय. कडून सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात स्वयंपाक करणाऱ्या महिलेविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याबाबत

**(५७) * ३४८४७ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सोवळे मोडल्याच्या कारणावरून राज्याच्या हवामानशास्त्र विभागाच्या संचालिका यांनी स्वयंपाक करणाऱ्या महिलेविरुध्द सिंहगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्हा दाखल करून घेतल्यामुळे अंधश्रध्देला खतपाणी घालून समाजात तेढ निर्माण झाल्याने विविध संघटना व राजकीय पक्षांनी पुण्यामध्ये आंदोलने व निदर्शने केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित तक्रारदार व पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यामुळे कोणत्याही राजकीय अथवा सामाजिक संघटनेने गुन्हा का दाखल केला म्हणून आंदोलने अथवा निदर्शने केलेली नाहीत. परंतु दिनांक २७/९/२०१७ रोजी बालगंधर्व रंगमंदिर या ठिकाणी संभाजी ब्रिगेड व सकल मराठा बहुजन समाज यांचेवतीने हवामान संचालिका यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ मराठी अस्मिता परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.
(३) सदर घटनेबाबत फिर्यादीच्या तक्रारीवरून सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे एका महिलेविरूद्ध गु.र.नं. २८६/२०१७ भा.दं.वि. कलम ४१९, ३५२, ५०४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तदनंतर सदरचा प्रकार ईलेक्ट्रॉनिक माध्यमे व वृत्तपत्रामध्ये मोठ्या प्रमाणात चर्चिला गेल्याने फिर्यादीने सदरची तक्रार मागे घेण्यासाठी लेखी विनंती अर्ज व जबाब दिलेला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई व ठाणे शहराला जोडणाऱ्या कोपरी उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५८) * ३५६४५ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व ठाणे शहराला जोडणाऱ्या कोपरी येथील उड्डाणपुलाच्या नव्या आराखड्यानुसार रुंदीकरणाच्या कामाची निविदा माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उड्डाणपुलाचा खर्च अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे ९ कोटी रुपयांवरुन २५८ कोटी रुपयांपर्यंत वाढ झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उड्डाणपुलाचे कामास विलंब करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त उड्डाणपुलाच्या कामासाठी किती खर्च येणार आहे तसेच किती कालावधीत पुलाचे काम पूर्ण होणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) पूर्व द्रुतगती महामार्ग ठाणे शहरातून जाताना कोपरी जवळ मध्य रेल्वे ओलांडत आहे. या ठिकाणी सध्या २+२ वाहिन्यांचा पुल अस्तित्वात असून या पुलाचे रुंदीकरण करण्यासाठी दिनांक १२/०२/२००१ रोजी रुपये ९ कोटी खर्चाच्या कामास सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मान्यता देण्यात आली होती. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेतलेल्या सदर पुलाच्या बांधकामास झालेल्या विलंबाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आली असून सदर समितीच्या अहवालानुसार सदर प्रकरणी व्यक्तिशः कोणीही अधिकारी जबाबदार नसल्याचा निष्कर्ष आहे.

प्रश्नाधीन ठिकाणी अस्तित्वात असलेल्या २+२ वाहिन्यांच्या पूलाचे ४+४ वाहिन्यांकरीता रुंदीकरण करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रेल्वेकडे सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास रेल्वेकडून दिनांक १५/०४/२०१५ रोजी मान्यता मिळाली. या प्रस्तावाप्रमाणे प्रकल्पासाठी रु ११३.७४ कोटी खर्च अपेक्षित होता.

निधीअभावी विलंब होण्याची शक्यता असल्याने सदर काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कार्यान्वित करण्याची लोकप्रतिनिधींची तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाची दिनांक ०१/०७/२०१५ ची विनंती विचारात घेऊन प्राधिकरणाने दिनांक २९/०२/२०१६ रोजी रुपये २५८.७६ कोटी खर्चाच्या प्रस्तावास मान्यता दिली. तद्नंतर पुलाच्या उंची बाबत रेल्वेशी झालेला संवाद तसेच प्रश्नाधीन पुलाच्या ठिकाणी असणाऱ्या रेल्वे मार्गिका, जलवाहिन्या विचारात घेऊन पूर्वीच्या दोन्ही बाजूंना रुंदीकरण करण्याचे प्रस्तावानुसार प्रकल्पाचे बांधकाम करण्याचा दिनांक २७/०९/२०१७ रोजी निर्णय घेण्यात आला.

या प्रकल्पातील रेल्वे हद्दीतील पुलाचे काम रेल्वेमार्फत करण्यात येणार असून याकरीता आवश्यक निधी प्राधिकरणामार्फत रेल्वेला देण्यात येईल. तर रेल्वे हद्दीबाहेरील पुलाचे पोचमार्गाचे काम प्राधिकरणामार्फत करण्यात येईल.

प्राधिकरणामार्फत करण्यात येणाऱ्या कामाकरीता दिनांक २७/०९/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या असून रेल्वेमार्फत करण्यात येणाऱ्या कामासाठी त्यांचेकडून दि ०७/११/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या आहेत.

प्राधिकरणाने निविदा मागविलेल्या कामासाठी रुपये १३५.७० कोटी खर्च अपेक्षित आहे. प्राधिकरणामार्फत रेल्वेला या कामासाठी रुपये ९० कोटी देण्यात येणार असून रुपये २३ कोटी रक्कम जमा करण्यात आली आहे.

-----------------

## शासनाचा माहिती व जनसंपर्क विभाग सक्षम करण्याबाबत

**(५९) * ३६०१४ श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडे स्वतःचा माहिती आणि जनसंपर्क विभाग असतानाही राज्य शासनाच्या जाहिराती करण्याकरिता खाजगी कंपन्यांना रुपये ३०० कोटी अदा करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची कारणे काय आहेत,

(३) नसल्यास, माहिती आणि जनसंपर्क विभाग सक्षम करण्याकरिता शासन कोणती उपाययोजना करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) लोकराज्य मासिक ५ भाषांमधून प्रकाशित, मंत्रालयामध्ये चित्रिकरणासाठी अद्यायावत स्टुडिओची उभारणी, माध्यम प्रतिसाद केंद्राची उभारणी, महाराष्ट्र वार्षिकीचे प्रकाशन, दिलखुलास, मी मुख्यमंत्री बोलतोय, जय महाराष्ट्र या सारख्या कार्यक्रमांची निर्मिती व प्रसारण, संवाद पर्व, महाराष्ट्र माझा या सारख्या कार्यक्रमांची अंमलबजावणी, तसेच या कार्यक्रमासाठी मागील ३ वर्षामध्ये भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली.

-----------------

## श्री क्षेत्र पंढरपूर येथे मल्टीस्पेशालिटी रुग्णालय स्थापन करण्याबाबत

**(६०) * ३५६१९ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर हे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे तीर्थक्षेत्र असल्याने दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येत असून सदर भाविकांच्या व स्थानिक नागरिकांच्या उपचारासाठी कार्यरत असणारे उपजिल्हा रुग्णालयातील सोई-सुविधा भाविकांची व स्थानिक नागरिकांची लोकसंख्या विचारात घेता अपुरी पडत असल्याने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती यांच्यावतीने श्री क्षेत्र पंढरपूर येथे भक्तांच्या सेवेसाठी मल्टीस्पेशालिटी रुग्णालय स्थापन करण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने मल्टीस्पेशालिटी रुग्णालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे देवस्थान समितीच्या दिनांक ७/९/२०१७ रोजीच्या सभेत पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालय चालविण्यासाठी घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसमतनगर (जि.हिंगोली) नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्याबाबत

**(६१) * ३५३९८ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमतनगर (जि.हिंगोली) नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांचे माहे मे, २०१७ पासूनचे वेतन थकित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून सहाय्यक अनुदानात मिळालेल्या ११ कोटी ४५ लक्ष रुपये वेतन व सेवाशर्ती यावर खर्च करण्याऐवजी अन्य प्रकारच्या नियमबाहय कामावर खर्च करुन संबंधितांनी आर्थिक गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी कर्मचारी व सुज्ञ नागरिक हे विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांचे कार्यालयावर बेमुदत उपोषण व धरणे आंदोलन करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर्मचाऱ्यांचे वेतन देवून नियमबाहय कामावर केलेल्या खर्चाची चौकशी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वसमतनगर (जि.हिंगोली) नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांचे माहे मे, २०१७ पासूनचे वेतन थकित होते, हे खरे आहे

(२) सदर विषयाबाबत कर्मचारी संघटनेकडून जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली आहे.

(३) दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत विभागीय आयुक्त, औरंगाबाद येथे स्वच्छता व पाणीपुरवठा विभागातील चतुर्थश्रेणी कर्मचारी यांनी धरणे आंदोलन केले होते.

(४) वसमतनगर (जि.हिंगोली) नगरपरिषदेतील सर्व अधिकारी, कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांचे माहे ऑक्टोबर २०१७ अखेर संपूर्ण वेतन अदा करण्यात आले आहे.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी चौकशी समिती गठीत केली असून, सदर चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून तो तपासण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हाडाने जाहिर केलेल्या सोडतीतील घरांच्या किंमती कमी करण्याबाबत

**(६२) * ३५१०६ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाने मुंबई शहरात अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट तसेच उच्च उत्पन्न गटांकरिता ८१९ घरांसाठी सोडत जाहिरात माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडाने जाहिर केलेल्या सोडतीतील निर्धारित घरांच्या किंमती खाजगी विकासकापेक्षा जास्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे सामान्य नागरिकाला यापासून वंचित राहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, घरांच्या किंमती कमी करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

म्हाडाच्या प्रचलित विक्री धोरणानुसार विविध योजनांतील सदनिकांची विक्री किंमत ही साधारण रेडी रेकनरच्या दरापेक्षा सुमारे ७० ते ८० % एवढी येते. तसेच खाजगी विकासकांनी बांधलेल्या घरांचे दर हे मॅजिक ब्रिक्स व ९९ एकर्स या संकेतस्थळावरील असलेल्या दरांशी म्हाडाच्या सोडतीतील दरांची तुलना केली असता म्हाडाच्या घरांचे दर हे कमी असल्याचे दिसून येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# मुंबईतील जुन्या इमारतींना पुनर्विकासासाठीच्या नविन धोरणाचा लाभ देण्याबाबत

**(६३) * ३५८३० श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक २७९५० ला दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ९ हजार इमारतींचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर इमारतींचा पुनर्विकास करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मुंबई उपनगरातील ३० वर्षे जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींना पुनर्विकासासाठीच्या नवीन धोरणाचा लाभ देण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त नवीन धोरणाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत असणाऱ्या एकूण १४२८६ पैकी सदर इमारती आहेत.

(२) सदर प्रकरणी चौकशीची आवश्यकता नसून, सदर इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत आवश्यक कार्यवाही केली जात आहे.

(३) होय.

या अनुषंगाने नगरविकास विभागाने पत्र क्रमांक टिपीबी ४३१५/प्र.क्र.१२८/२०१५/नवि-११, दिनांक ०८/०९/२०१७ रोजीच्या अधिसुचनेव्दारे विकास नियंत्रण नियमावली ३३(७)(अ) नव्याने लागू केली आहे.

(४) सदरची बाब मुंबई महानगरपालिका व नगरविकास विभाग यांच्याशी संबंधित आहे. याबाबत नगरविकास विभाग यांच्याकडून सविस्तर अभिप्राय घेणे योग्य होईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांदिवली (पूर्व), मुंबई येथील महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(६४) * ३५६७२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांदिवली (पूर्व), मुंबई येथील महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीची दुरवस्था झाली असून शासकीय कर्मचाऱ्यांसह विद्यार्थांचा जीव धोक्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीचा प्रवेशव्दाराचा लोखंडी दरवाजा काढून ठेवण्यात आला असून इमारतीचे नाम फलक जमिनीवर पडलेले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारतीत सुरक्षा रक्षक आणि सफाई कर्मचाऱ्यांची कमतरता असून अपुरी अग्निशमन यंत्रणा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कांदिवली (पूर्व) येथील ए, बी व सी विंग असलेल्या तळमजला + ३ मजले असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीची दुरवस्था झाली असे निदर्शनास आलेले नाही.
(२) सदर इमारतीत प्रवेश करण्यासाठी असलेल्या २ प्रवेशद्वारांपैकी १ प्रवेशव्दाराचा लोखंडी दरवाजा निखळल्यामुळे संभाव्य अपघात टाळण्यासाठी तो काढून टाकण्यात आला होता तसेच सहकार व वस्त्रोद्योग विभागाचा जुना नामफलक जमिनीवर ठेवण्यात आला होता ही वस्तुस्थिती आहे.

(३), (४) व (५) सदर इमारतीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

- सदर इमारतीच्या प्र प्रवेशव्दारावरील लोखंडी दरवाजाची दुरुस्ती दिनांक २१/११/२०१७ रोजी पूर्ण करण्यात आली असून, तो सदर इमारतीच्या प्रवेशव्दारावर बसविण्यात आला आहे.
- सदर इमारतीत सहकार व वस्त्रोद्योग विभागामार्फत नवीन नामफलक लावण्यात आला असून, जुना नामफलक महानगरपालिकेमार्फत हटविण्यात आला आहे.
- सदर इमारतीच्या सुरक्षेसाठी महानगरपालिकेमार्फत सकाळी ७ ते दुपारी ३, दुपारी ३ ते रात्रौ ११ व रात्रौ ११ ते सकाळी ७ या ३ पाळयांमध्ये प्रत्येकी २ सुरक्षा रक्षक पुरविण्यात आले आहेत.
- सदर इमारतीत कायमस्वरुपी सफाई कर्मचारी नसून, महानगरपालिकेमार्फत आवश्यकतेनुसार सफाई कर्मचारी पाठविण्यात येतात.
- सदर इमारतीच्या "सी" विंगमधील इमारत प्रस्ताव विभाग कार्यालयाचे नुतनीकरण/अंतर्गत पुनर्रचना याकरिता अग्निशमन दलामार्फत दिनांक २५/०५/२०१६ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.
- सदर इमारतीच्या "सी" विंगच्या अंतर्गत नुतनीकरणासाठी कामाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागविण्याची कार्यवाही सुरु आहे.

तथापि, सदर इमारतीतील ए, बी विंगमध्ये व सी विंगमधील उर्वरित जागेमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

-----------------

## गव्हाणपाडा (चेंबुर, मुंबई) येथे डिझेलची चोरी झाल्याबाबत

**(६५) * ३४७६३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गव्हाणपाडा (चेंबुर, मुंबई) येथे भारत पेट्रोलियम कंपनीच्या भिंतीलगत टँकर पार्किंग करुन भूमिगत डिझेल पाईपला टॅपिंग करुन डिझेल चोरी करणाऱ्या टोळीला आरसीएफ पोलिसांनी अटक केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार डिझेलची चोरी करणाऱ्या टोळीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, भविष्यात अशाप्रकारे डिझेल चोरी होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरहू प्रकरणी आर.सी.एफ. पोलीस ठाणे, चेंबुर, मुंबई येथे दिनांक ६/०९/२०१७ रोजी गु.र.क्र. २४२/१७ कलम ३७९, २८५, ४११, ३४ भा.दं.वि. सह कलम १५(२) पेट्रोलियम व मिनरल पाईप लाईन कायदा १९६२ सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी संबंधित टोळीवर उक्त प्रमाणे गुन्हा नोंद करुन अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(३) सदर परिसरात पाईप लाईनवर लक्ष ठेवण्याकरिता संबंधित कंपनीचे सुरक्षारक्षक व सी.आय.एस.एफ पोलिसांची सतत गस्त ठेवली जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंब्रा (ठाणे) येथे पोलीस ठाण्यात नफीस अन्सारीकडून खोटा कबुली जबाब घेतल्याबाबत

**(६६) * ३५०८६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंब्रा (ठाणे) येथे पोलीस ठाण्यात दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुंब्रा येथील नफीस अन्सारी याला धमकावून मारहाण करुन त्याने न दिलेल्या कबुली नाम्यावर सही करण्याचे नाकारल्यावर त्याच्याकडून

कोऱ्या कागदावर त्याच्या आईला भिती दाखवुन अन्सारीकडून सही करुन घेतली अशा प्रकारची तक्रार अन्सारी याने ठाणे पोलीस आयुक्त, मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हमीद अन्सारीच्या निवेदनाचे व तक्रारीचे स्वरुप काय आहे, तसेच त्यासंबंधी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर अर्जामध्ये अर्जदार यांनी मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, २ पोलीस कर्मचारी हे विनाकारण वारंवार पोलीस ठाण्यास बोलावून त्यांच्याकडून फोटो ग्राफ, पॅन कार्डची प्रत, तसेच अर्जदार यांचेविरुध्द घाटकोपर पोलीस ठाणे येथे सिमी संघटनेच्या संबंधाच्या अनुषंगाने दाखल गुन्हयाची कागदपत्रांची प्रत मागतात. तसेच अर्जदार यांच्या नोंदविलेल्या जबाबावर स्वाक्षरी करण्यासाठी दबाव आणून शिवीगाळ करुन दमदाटी करतात. अशा आशयाची तक्रार केली आहे. सदर तक्रारीत सकृतदर्शनी तथ्य आढळून येत नाही.

अर्जदार यांचा प्रतिबंधित सिमी संघटनेशी संबंध असल्याचे आढळून आल्याने, त्यांचेविरुध्द घाटकोपर पो.स्टे. स्थानिक गु.नोंद क्र. ११०६/०६ कलम १०, १३ बेकायदेशीर कृत्य(प्रतिबंध) अधिनियम १९६७ सुधारित २००४ अन्वये गुन्हा दाखल असून त्याचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) नगरपंचायतीतील मुख्याधिकाऱ्याचे रिक्त पद भरण्याबाबत

**(६७) * ३५३२६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड (जि.पालघर) नगरपंचायतीमध्ये मुख्याधिकारी हे पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायतीमध्ये मुख्याधिकारी नसल्यामुळे अनेक विकास कामे प्रलंबित असून नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार सदर रिक्त पद किती कालावधीत भरण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ (सीपीटीपी-३) या तुकडीतील मुख्याधिकारी यांची विक्रमगड नगरपंचायत (जि.पालघर) या पदावर दिनांक १७/१२/२०१६ च्या आदेशान्वये परिविक्षाधीन मुख्याधिकारी म्हणून On Field Training स्वरुपात नियुक्ती करण्यात आली आहे.

तथापि, ते दिनांक ०६/०३/२०१७ पासून वैद्यकीय कारण देऊन अनुपस्थित असल्याने त्या पदाचा अतिरिक्त कार्यभार मुख्याधिकारी, जव्हार नगरपरिषद यांचेकडे सोपविण्यात आला आहे. त्यांच्यामार्फत नगरपंचायतीची विविध कामे करण्यात येत आहेत.

मुख्याधिकारी, विक्रमगड नगरपंचायत यांची प्रदिर्घ अनधिकृत अनुपस्थिती लक्षात घेता, त्यांची परिविक्षाधीन नियुक्ती रद्द का करु नये, याबाबत त्यांना नोटीस बजावण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाकोला ब्रिज (मुंबई) व परिसरात वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(६८) * ३६२२३ श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाकोला ब्रिज (मुंबई) व परिसरात वाहतूक कोंडी होत असल्याने यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.परिवहन मंत्री महोदयाकडे पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाकोला ब्रिज ते सांताक्रुझ स्टेशन हा पायी १० मिनिटाचा रस्ता वाहनाने गाठण्याकरिता कमीत कमी अर्धा तास लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाकोला ब्रिज वरून पश्चिम द्रुतगतीवर जाणारा सिग्नल देखील अत्यंत कमी वेळाचा म्हणजे केवळ १० सेकंदाचा ठेवला जात असल्याने वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उपरोक्त प्रकरणी उपाययोजना करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) निवेदन प्राप्त झाले असून त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
सदर सिग्नलची वेळ ५० सेकंद इतकी आहे.
(४) वाकोला जंक्शन येथील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

i) वाहतूकीच्या प्रवाहांचा अभ्यास करुन सिग्नलच्या चारही रस्त्यांसाठी वेगवेगळया वेळा ठरविण्यात आल्या आहेत.

ii) एमएमआरडीए कडून उत्तर वाहिनीच्या स्लीप रोडला जोडण्यासाठी मधल्या नाल्यावर पूल बांधण्यांत आलेला आहे. यान्वये वाकोला चौकातील वाहतूकीस सांताक्रुझ स्टेशनकडे जाणाऱ्या रोडवरील वाहतूक कमी होऊन वाहतूक कोंडी होणार नाही अशी व्यवस्था करण्यांत आलेली आहे.

iii) वाकोला जंक्शन ते सांताक्रुझ, चैतन्य नगर गल्ली ते वाकोला जंक्शन या मार्गावरील वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा पध्दतीने पार्क केलेल्या वाहनांवर सातत्याने कारवाई करण्यात येते.

iv) सांताक्रुझ स्टेशनपासून १५० मिटर अंतरापर्यंत फेरीवाले बसणार नाहीत याकरीता १ पोलीस कर्मचारी वाहतुकीचे नियमन करण्यासाठी तर स्थानिक पोलीस ठाण्याचे २ पोलीस कर्मचारी पिक-अवर्समध्ये नेमले जातात.

v) नेहरु रोडवरील बिल्व भवन क्रॉसींगजवळ एका पोलीस कर्मचाऱ्याची वाहतूक नियमनासाठी नेमणूक केली जाते.

vi) सांताक्रुझ स्टेशनवरुन स्कायवॉकमार्गे येणारे पादचारी तसेच स्कायवॉकच्या खालील रस्त्यावरुन येणारे पादचारी यामुळे वाहतुकीच्या प्रवाहास खंड पडत असल्याने वाकोला चौकात २ ट्रॅफिक वार्डन नेमण्यांत आले असून स्थानिक पोलिसांच्या मदतीने आवश्यकतेनुसार पादचाऱ्यांना थांबवून ठेवण्यात येते.

vii) गोळीबार रोड नं.७ वर महानगरपालिकेमार्फत बहुतांश ठिकाणी रस्ते दुभाजक बसविण्यांत आले आहेत. तसेच या रोडवर वाहतुकीस अडथळा करणाऱ्यां वाहनांवर वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

viii) वाकोला जंक्शन ते सांताक्रुझ स्टेशन दरम्यान गोळीबार रोड परिसरामध्ये पिक अवर्समध्ये गस्तीसाठी रायडर नेमून वाहतुक सुरळीत करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नायगाव (जि.नांदेड) शहरातील चोरींच्या घटनांचा तपास करण्याबाबत

**(६९) * ३५५७० श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) शहरातील दत्तनगर भागात तीन ठिकाणी तर खैरगांव येथे एका ठिकाणी चोरटयांनी धाडसी चोऱ्या करुन हजारो रुपयांचा ऐवज चोरुन नेला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर चोरींच्या घटनांचा तपास करुन चोरटयांना अटक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

माहे सप्टेंबर, २०१७ या महिन्यात दत्तनगर भागात चोरीच्या घटनांसंबंधाने पोलीस स्टेशन नायगाव येथे कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

तथापि, माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये चोरीच्या तक्रारीवरुन एक गुन्हा दाखल आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, नायगाव येथे गु.र.नं. १६२/२०१७ भा.दं.वि. कलम ४५७, ४५४, ३८० प्रमाणे दिनांक १६/१०/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा शोध घेणे करता श्वान पथक, अंगुली मुद्रा तज्ञ यांची मदत घेण्यात येत असुन, गुन्हाचा तपास सुरु आहे.

(३) विलंब झाला नाही.

-----------------

## ठाणे येथील महापालिकेच्या मेडीकल स्टोअर्स कंत्राटदारांकडून भाडे वसुली करण्याबाबत

**(७०) * ३४८०३ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील डी.वाय.पाटील मेडीकल स्टोअर्स या खाजगी कंत्राटदाराला प्रतिमाह रुपये १४ लाख १० हजार भाडे देण्याच्या निविदेनुसार माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदाराने मेडीकल स्टोअर्स सुरु करुनही अद्याप एकाही महिन्याचे भाडे महापालिकेला अदा न करता मेडीकल स्टोअर्स ८ महिन्यानंतर परस्पररित्या बंद केल्यामुळे महापालिकेला थकीत भाड्यापोटी रुपये १ कोटी १० लाखांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेडिकल स्टोअर्स कंत्राटदारांकडून सलग ८ महिने भाडे वसुली न करण्यास महापालिका स्तरावरील कोणते अधिकारी जबाबदार आहेत व त्यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरची थकीत रक्कम संबंधित ठेकेदाराकडून वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

कंत्राटदाराने दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी दुकान सुरु केले व निविदेनुसार मासिक भाडे प्रदान न करता TDS व सेवा कर वजा करून उर्वरित रक्कम मासिक भाडे म्हणून नोव्हेंबर, २०१६ पर्यंत प्रदान केले आहे.

परंतु, TDS व सेवा कर शासनाच्या संबंधित खात्यात भरल्याची कागदपत्रे वारंवार मागणी करूनही कंत्राटदाराने सादर केली नसल्याने ठाणे महापालिकेने सदर दुकान दिनांक ०१/०४/२०१७ रोजी सीलबंद केले आहे.

कंत्राटदाराकडून एकुण रुपये १,०५,७८,४९३/- ची दिनांक ३१/१०/२०१७ रोजी थकबाकी आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) कंत्राटदाराने थकीत रक्कम वसुल करण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही केल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे:-

- कंत्राटदाराची निविदा अनामत व सुरक्षा अनामत रक्कम एकूण रुपये ४७,३०,०००/- जप्त करण्यात आले आहेत.
- दुकानातील जप्त मालाची रक्कम वसुल योग्य रकमेत समायोजित करण्यात येणार आहे.
- दुकानाच्या रोख पेटीतील रुपये ५०,३८०/- इतकी रक्कम जप्त करण्यात आली आहे.
- उर्वरीत रक्कम वसुल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोहबाळा (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील एमआयडीसी मधील कामगारांना कामावर घेण्याबाबत

**(७१) * ३५७४३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहबाळा (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील एमआयडीसी मधील साई वर्धा पॉवर जनरेशन कंपनीतील इन्कोटेक कंपनीने कोणतेही कारण नसताना दिडशे कामगारांना कामावरुन कमी केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगारांना कामावरुन कमी केल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने मध्यस्थी करुन उक्त कामगारांना पुन्हा कामावर घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कामगारांना कामावर न घेणाऱ्या कंपनीच्या संचालकांविरुध्द कोणते गुन्हे दाखल करण्यात आले आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) साई वर्धा पॉवर जनरेशन लि. मोहबाळा, ता.वरोरा, जि.चंद्रपूर येथील चेन्नई राधा वर्क्स प्रा.लि. या कंत्राटदार कंपनीचे जून, २०१७ पासून कंत्राट संपल्यामुळे त्यांचेकडील कार्यरत १५० कंत्राटी कामगारांना कमी करण्यात आल्याबाबत संबंधित कंत्राटी कामगारांनी दिनांक २४/०७/२०१७ रोजी सहायक कामगार आयुक्त, चंद्रपूर यांना निवेदन दिले आहे.

(२) साई वर्धा पॉवर जनरेशन लि. या आस्थापनेकडील ठेकेदार कंपनी चेन्नई राधा इंजिनिअरिंग वर्क्स प्रा.लि. यांचे कंत्राट जून, २०१७ नंतर सुरु न ठेवल्याने/नुतनीकरण न केल्याने सदर कंत्राटदाराकडील सुमारे १५० कंत्राटी कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे.

(३) याप्रकरणी प्राप्त झालेल्या संबंधित कंत्राटी कामगारांच्या निवेदनाच्या अनुषंगाने व्यवस्थापन, कंत्राटदार कंपनी चेन्नई राधा इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि. इन्कोटेक तसेच कंत्राटी कामगारांना अपर कामगार आयुक्त नागपूर यांचे कार्यालयाकडून समेट कारवाई करण्याकरीता दिनांक २८/०७/२०१७, दिनांक ०३/०८/२०१७, दिनांक ११/०८/२०१७ व दिनांक २४/०८/२०१७ रोजी बैठकीकरिता बोलविण्यात येऊन तडजोड करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

तसेच याप्रकरणी दिनांक ०१/०९/२०१७ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी व दिनांक ०४/१०/२०१७ रोजी अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या दालनात उभयपक्षांमध्ये बैठक घेण्यात येऊन तडजोड करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर दिनांक १५/११/२०१७ रोजी उप विभागीय अधिकारी, वरोरा यांचे दालनात बैठक घेण्यात आली. सदर बैठकीच्या वेळी व्यवस्थापनाने सद्यस्थितीत कंपनीचे दोन युनिट सुरू असून पुरेशा कोळश्याअभावी इतर दोन युनिट बंद करण्यात आल्याचे नमुद केले व पुरेसा कोळसा मिळण्याच्या उद्देशाने पाठपुरावा करण्यात येत असून, पुरेसा कोळसा प्राप्त होताच बंद झालेले युनिट पुन्हा पुर्ववत सुरू करून कामगारांना कामावर घेण्यात येईल असे सांगितले. यासंदर्भात अपर कामगार आयुक्त यांचे कार्यालयाकडून व्यवस्थापनाशी संपर्क केला असता त्यांनी दिनांक १५/११/२०१७ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही सुरू असल्याचे कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगोला (जि.सोलापूर) शहरात डास प्रतिबंधक उपाययोजना राबविण्याबाबत

**(७२) * ३५५१४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) नगरपालिकेच्या निष्क्रियतेमुळे शहरात डासांचा प्रादुर्भाव झाला असून त्यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथे साथींच्या आजारांचा फैलाव होवू नये यासाठी डास प्रतिबंधक उपाययोजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे ऑक्टोबर, २०१७ दरम्यान मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाल्याने ठिकठिकाणी पावसाचे पाणी साचल्यामुळे शहरात डासांचा प्रादुर्भाव झाला होता, ही बाब खरी आहे.
(२) शहरात ठिकठिकाणी साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यात आला असून डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शास्त्रशुध्द पध्दतीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. तसेच नागरीकांना डेंग्यू/चिकन गुनिया या रोगांच्या अळी प्रतिबंधासाठी औषधे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला शहरातील भूमिगत गटार योजना प्रलंबित असल्याबाबत

**(७३) * ३५५७५ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरातील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या भूमिगत गटार योजनेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री व नगरविकास विभाग यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत अकोला शहरासाठी रुपये ७९.२३ कोटी च्या मलनि:स्सारण प्रकल्पास माहे मे, २०१७ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

प्रकल्पातील मलनि:स्सारण संचाकरिता आवश्यक असलेली जागा ताब्यात घेऊन प्रकल्पाच्या कामाचे कार्यादेश देण्याची कार्यवाही अकोला महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

-----------------

## कळवा (जि.ठाणे) पोलीस स्टेशन मधील कर्मचाऱ्यांनी हॉटेल कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याबाबत

**(७४) * ३४७२९ श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) येथील सायबा फॅमिली रेस्टॉरंट मध्ये कळवा पोलीस स्टेशन मधील पोलीस हवालदार व त्याच्या ५ साथीदारांनी दारु पिल्यानंतर दारुचे देयक मागितल्याने हॉटेल कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याची घटना दिनांक २६ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी एक पोलीस हवालदार यांनी मारहाण केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचे विरोधात कळवा पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा रजि. नं. १९८०/२०१७ भा.दं.वि. कलम ३२३ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. तसेच त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. याप्रकरणी एकूण ८ कर्मचाऱ्यांविरुध्द प्राथमिक चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माटुंगा पुलावरील खड्डे महानगरपालिकेने मातीने बुजविल्याबाबत

**(७५) * ३५२६९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटुंगा (मुंबई) येथील टी.एच.कटारिया मार्गावरील माटुंगा पुलावरील खड्डे महानगरपालिकेने मातीने बुजविले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुल दुचाकीस्वारांसाठी धोकादायक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर खड्डयांचे कॉंक्रीटीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माटुंगा (मुंबई) येथील टी.एच.कटारिया मार्गावरील माटुंगा पुलावरील खड्डे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मातीने बुजविण्यात आलेले नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

माटुंगा येथील टी.एच.कटारिया मार्गावरील माटुंगा पुलावरील पावसाळयात निर्माण झालेले खड्डे तांत्रिक कारणामुळे मास्टिक अस्फाल्टने बुजविणे उचित नसल्यामुळे, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तात्पुरत्या स्वरुपात डांबर मिश्रित खडीच्या (Cold Mix) सहाय्याने बुजविण्यात आले होते.

पावसाळयानंतर सदर पुलावरील खड्डे मास्टिक अस्फाल्टने व्यवस्थितरित्या बुजविण्यात आले आहेत.

-----------------

## पंढरपूर या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयाबाबत

**(७६) * ३६५४५ श्री.तानाजी सावंत, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी कॅनडा शासनाने दोन हजार कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार केला असून या योजनेसाठी कॅनडा शासन, मंदिर समिती आणि नगरपरिषद यांच्यात करार होणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विकास कामांतर्गत पाणीपुरवठा, आरोग्य, रस्ते, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, वारकऱ्यांसाठी निवारा अशा मुलभूत सोयीसुविधांचा समावेश करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंढरपूर विकास प्राधिकरणाचा प्रारुप विकास आराखडा प्रसिध्द झाल्यानंतर पंढरपूर तालुक्यातील सुमारे ४१ गावांनी प्रस्तावित आराखडयास आपली जमीन न देण्याचा निर्णय घेतलेला असून याबाबत मोठे आंदोलन उभे करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नमामि चंद्रभागा योजनेकरिता पैसे नसल्यामुळे सन २०१० मध्ये भूमिपूजन केलेला जूना अकलूज रस्ता अजूनही अर्धवट अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) असा करार अद्याप झालेला नाही.

पंढरपूर तीर्थक्षेत्राला स्मार्ट तीर्थक्षेत्र (Smart Pilgrimage) करण्यासाठी कॅनडा शासनाने स्वत:हून सहकार्य देवू केले आहे. कॅनडा देशाच्या मुंबईस्थित वाणिज्य दुतावास अधिकाऱ्यांसोबतच्या दिनांक २२/०९/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत त्यांनी यासंदर्भात तज्ञ व्यक्तीमार्फत सर्वेक्षण करुन स्मार्ट तीर्थक्षेत्राबाबतचा प्रकल्प अहवाल तयार करुन सादर करण्याचा ठेवलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे.

(३) अशा आशयाचे वृत्त दै. लोकमत या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०८/१०/२०१७ रोजी प्रसिध्द झाले होते.

(४), (५) व (६) जुना अकलूज रस्ता “नमामि चंद्रभागा योजनेंतर्गत” समाविष्ट नसून “पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात” समाविष्ट आहे. यासाठी रू. १७.५३ कोटी एवढा निधी शासनाने उपलब्ध करून दिला आहे. उर्वरित २७.८३ कोटी एवढ्या निधीची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सोलापूर यांनी ग्रामविकास विभागाकडे केली आहे.

-----------------

## मुंबई मेट्रो-३ प्रकल्पाच्या कामामुळे इमारतीस तडे जात असल्याबाबत

**(७७) * ३४७१६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मेट्रो-३ प्रकल्पाच्या कामासाठी रात्रीच्या वेळेत अवजड वाहने व अवजड मशीनची वाहतूक करु देण्याची मुंबई मेट्रो महामंडळाची (एमएमआरसीएल) विनंती मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास फेटाळली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या कामामुळे कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मार्गावरील सिध्दार्थ महाविद्यालयाची इमारत व अन्य इमारतींनाही हादरे बसत असल्यामुळे त्यांना तडे जावून धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिध्दार्थ महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सदर कामामुळे इमारतीस तडे जात असल्याचे तसेच मशीनच्या कर्कश आवाजामुळे विद्यार्थ्यांना त्रास होत असल्याने सदरचे काम बंद करणेबाबतचे पत्र MMRDA, MMRCA व मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई मेट्रो - ३ प्रकल्पामधील कफ परेड येथील मेट्रो स्टेशनच्या बांधकामाकरिता उत्खनन व वाहतूक या कामासाठी रात्री १०.०० ते सकाळी ६.०० या वेळेत मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. २१०७/२०१७ मध्ये दिनांक ११/८/२०१७ रोजीच्या अंतरीम आदेशान्वये पुढील सुनावणीपर्यंत बंदी घातली आहे. तसेच दिनांक ३०/११/२०१७ रोजीच्या आदेशान्वये रात्री १०.०० ते १२.०० या कालावधीमध्ये उत्खननातून निघालेल्या साहित्याची कफ परेड येथून वाहतूक करण्यास ३ दिवसासाठी प्रायोगिक तत्वावर अनुमती दिली आहे.

(२) नाही.

(३) होय.

(४) व (५) मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी व सल्लागारांनी सदर महाविद्यालयाच्या इमारतीची प्राचार्य, सिध्दार्थ महाविद्यालय यांचेसह संयुक्त पाहणी केलेली असून मेट्रो लाईन-३ च्या कामामुळे सदर इमारतीस तडे गेले नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

-----------------

## मुंबई महापालिकेच्या शाळांचा दर्जा सुधारणेबाबत

**(७८) * ३५४६१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने विकास आराखडयातील तरतुदीनुसार १२ नवीन शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला असून या शाळांच्या बांधकामासाठी सुमारे २६ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या महानगरपालिकेच्या १ हजार ४८ प्राथमिक तर १४७ माध्यमिक शाळा असून महापालिकेच्या शाळांमधील शैक्षणिक दर्जा मोठया प्रमाणात खालावत असताना नवीन शाळांची बांधणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महापालिकेच्या शाळांमधून सुमारे तीन लाख विद्यार्थी शिक्षण घेत असून शाळांचा दर्जा सुधारावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकास आराखडयातील तरतुदीनुसार १२ नवीन शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला असून, सदर शाळांच्या बांधकामासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रुपये २४.२८ कोटी इतक्या रकमेची तरतुद करण्यात आली आहे ही वस्तुस्थिती आहे.
(२) शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १४/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १०४८ प्राथमिक शाळा व १४७ माध्यमिक शाळांमध्ये पायाभूत चाचणी व संकलित मुल्यमापन चाचणी-१ पार पडली असून, गुणांकन तक्त्याच्या आधारे सदर शाळांचा दर्जा चांगला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) सदर शाळांच्या दर्जामध्ये अधिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

- मोफत पाठयपुस्तके, २७ शालोपयोगी वस्तू, मध्यान्ह भोजन तसेच इ. ८ वी पासून विद्यार्थ्यांना टॅबचे वितरण केले जाते.
- व्हर्च्युअल क्लासरुमच्या माध्यमातून शैक्षणिक तासिकांचे आयोजन करुन विशेष मार्गदर्शन केले जाते.
- ज्ञानरचना वादावर आधारीत शैक्षणिक कामकाज व्हावे यासाठी विविध कार्यशाळांचे, प्रशिक्षणांचे, मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन केले जाते.
- इयत्ता ६ वी ते ८ वी या वर्गांना हस्तकला, चित्रकला व संगीत शिकविण्यासाठी तज्ञ शिक्षक उपलब्ध आहेत.
- शाळा सुधार प्रकल्पांतर्गत ५८ द्विभाषिक शाळांमध्ये इयत्ता १ ली पासून माध्यमाच्या भाषेबरोबर प्रथम भाषा इंग्रजी शिकविण्यात येते.
- महानगरपालिकेच्या सर्व शिक्षक, मुख्याध्यापक व विभाग निरीक्षक यांना इंग्रजीवर प्रभुत्व येण्यासाठी ब्रिटीश काऊन्सिलमार्फत विशेष प्रशिक्षण देण्यात येत आहे.

- माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग शिबिरांचे आयोजन केले जाते.
- गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस दिले जाते.
- प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना गणित, ऑलिम्पियाड, विज्ञान ऑलिम्पियाड, इंग्रजी ऑलिम्पियाड, प्रज्ञाशोध परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा तसेच अन्य आंतरराष्ट्रीय परीक्षांना बसता यावे यासाठी विद्यार्थ्यांची शैक्षणिक तयारी करुन घेण्यासाठी अभ्यासक्रम व परीक्षांचे नियोजन केले आहे.
- महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये संगणक प्रशिक्षण दिले जाते.
- इयत्ता १ ली ते ५ वी मधील विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांना शारीरिक शिक्षणाचे सेवांतर्गत प्रात्यक्षिकांसह विशेष प्रशिक्षण दिले जाते.
- विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रात रुची निर्माण व्हावी यासाठी मिनी सायन्स लॅबची निर्मिती करण्यात आली आहे.
- शिक्षण क्षेत्रामध्ये नव्याने होत असलेल्या सकारात्मक आधुनिक बदलांची जाणीवजागृती करण्यासाठी प्रशिक्षकांसाठी विविध प्रशिक्षणांचे आयोजन केले जाते.
- शाळांमध्ये चालणाऱ्या शैक्षणिक कामकाजाची माहिती करुन घेण्यासाठी व आवश्यकतेनुसार योग्य व समर्पक मार्गदर्शन करण्यासाठी महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्यांपासून ते विभाग निरीक्षक (शाळा) पर्यंत सर्व अधिकारी वर्ग शाळा भेटी देत असतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत साथीच्या रोगांची लागण झाल्याबाबत

**(७९) * ३४८१२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत डेंग्यू, लेप्टो, मलेरिया, गॅस्ट्रो, काविळ, पटकी इत्यादी साथीच्या रोगाची लागण झालेली असून माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान डेंग्यूमुळे ३ जणांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईत माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये डेंग्युमुळे एकूण १२ जणांचा मृत्यू झाला ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) मुंबईत साथीच्या आजारावर नियंत्रण आणण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात :-

- साथरोगाचे नियमित सर्वेक्षण करण्यात येते.
- किटकजन्य आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण तसेच, किटकनाशक फवारणी व धुम्रफवारणी करण्यात येते.
- जलजन्य आजारासाठी पाणी गुणवत्ता संनियंत्रण करण्यात येते.
- पदपथावरील अन्न, पाणी आणि बर्फ नमुन्यांची नियमित तपासणी करण्यात येते.
- मलेरिया रुग्णांवर राष्ट्रीय औषध धोरणानुसार समुळ उपचार करण्यात येतात.
- स्वाईन फ्लु (इन्फ्लुएन्झा ए एच १ एन १) रुग्णांवर लक्षणाच्या वर्गीकरणानुसार उपचार करण्यात येतात.
- लेप्टो नियंत्रणासाठी पिंजरे लावून उंदीर पकडणे, बिळांमध्ये वाफारणी करणे, पॉईझन बेटींग करणे व रात्रपाळी मुषक संहारक यांचेमार्फत उंदीर नष्ट करणे इत्यादी कार्यवाही करण्यात येते.
- सार्वजनिक क्षेत्रातील आरोग्य अधिकारी व निम्नवैद्यकीय कर्मचारी व खाजगी वैद्यकीय व्यवसायिक यांना पावसाळयात उध्दवणाऱ्या आजाराचे निदान, उपचार प्रतिबंध व नियंत्रण याबाबत प्रशिक्षण देण्यात येते.
- साथरोगाच्या निदानासाठी आवश्यक प्रयोगशालेय सुविधा उपलब्ध आहेत.

- औषध व इतर साधन सामुग्रीचा आवश्यक साठा उपलब्ध करुन दिला जातो.
- घनकचरा व्यवस्थापन, जल, पशुसंवर्धन इत्यादी विभागांशी समन्वय साधण्यात येतो.
- विविध जनसंपर्क माध्यमातून लोकप्रबोधन केले जाते.
- स्थानिक नगरसेवकांच्या सहकार्याने विभागवार आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येते.

-----------------

## पुणे महापालिकेत समाविष्ट गावांना मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८०) * ३५२४४ श्री.अनिल भोसले, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका हद्दीलगतच्या धानोरा-लोहगाव सह इतर गावांना २० वर्षापूर्वी महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आले असून या गावांमध्ये वीज, पाणी, रस्ते, आरोग्य व वाहतूक या सुविधा मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार उपरोक्त गावांना मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक ११/९/१९९७ रोजी पुणे महानगरपालिकेमध्ये २३ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे. या गावांना विविध सुविधा उपलब्ध होत नाहीत अशी बातमी दिनांक १३/१०/२०१७ रोजी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती, ही वस्तुस्थिती आहे. तथापि सदर गावांचा समावेश करण्यात आल्यानंतर पुणे महानगरपालिकेमार्फत खालील सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत :-

- धानोरा, साठे कॉलनी, मुख्य लोहगांव परिसरात विद्युत दिवे बसवून प्रकाश व्यवस्था करण्यात आली असून लोहगांव येथे एलइडी दिवे बसविले आहेत.
- प्रकाश व्यवस्था कायम चालू ठेवण्यासाठी व दुरूस्तीसाठी विद्युत विभागाकडून सदर गावांमध्ये वेळोवेळी कार्यवाही केली जाते.
- नगररोडवरील कळस, संगमवाडी, येरवडा, लोहगांव, धानोरी, कल्याणीनगर, वडगांवशेरी व खराडी या भागांसाठी पुरेसा पाणीपुरवठा होण्यासाठी योजना आखण्यात आली असून त्याची कामे प्रगती पथावर आहेत.
- अंदाजपत्रकीय व उपलब्ध तरतूदीनुसार विकास आराखड्यातील विभागांतर्गत पाण्याच्या लाईन्स व पाण्याच्या टाक्यांसाठी योजना करण्यात आल्या असून सदर गावांमध्ये पाणीपुरवठा करण्यात येत आहे
- प्रादेशिक विकास आराखड्यातील तसेच गावातील मुख्य रस्त्यांची देखभाल दुरूस्ती व नव्याने रस्ते बांधण्याची कामे करण्यात आलेली आहे.
- आवश्यकतेनुसार विविध ठिकाणी उड्डाणपूल, रस्ते, भूयारी मार्ग, नदीवरील पुल, जेएनएनयुआरएम अंतर्गत मुख्य रस्ते व बीआरटी मार्ग विकसित केले आहेत.
- विकास आराखडयातील रस्त्यांचे क्षेत्र सुमारे ९३० हेक्टर असून त्यापैकी सु. ५२८ हेक्टर म्हणजेच ५६% रस्ते विकसित करण्यात आले आहेत.
- उर्वरित क्षेत्राची भूसंपादन व रस्ते विकसनाची कार्यवाही सुरू आहे.
- पुणे महानगरपालिकेचे दवाखाने कार्यरत असून ज्या गावी दवाखाना उपलब्ध नाही तेथे मोबाईल व्हॅनव्दारे आरोग्य सुविधा पुरविण्यात येत असून रूग्णांवर औषध उपचार करण्यात येतात.
- साथीच्या आजारावर प्रतिबंधक व उपचारात्मक कार्यवाही करण्यात येते.
- सदर गावांना पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत प्रवासी बससेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
- तसेच मलनि:सारण विभागामार्फत मलवाहिनी टाकणे, मैलापाणी शुध्दीकरण प्रकल्प कार्यान्वित करणे, बाणेर, वडगांव, वारजे येथे मैलापाणी शुध्दीकरण केंद्राची कामे प्रस्तावित करण्यात आली आहे.

- सदरील गावांचा पुणे महानगरपालिकेत समावेश झाले असून महानगरपालिकेकडून सदरील गावांना आवश्यक त्या नागरी सोयी-सुविधा उपलब्ध केल्या जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी-कल्याण-शिळ मार्गावरील पुल कमकुवत झाल्याने त्यावरून होणारी अवजड वाहनांची वाहतूक बंद करण्याबाबत

**(८१) * ३४९१८ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-कल्याण-शिळ मार्गावरील रेल्वे प्रशासनाने काटई पुल सन १९६२ मध्ये बांधला असून या पुलाचे आयुष्यमान संपल्याची माहिती दिनांक १ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास एम.एस.आर.डी.सी. ला दिल्यानंतर व रेल्वे प्रशासनाने या पुलाची डागडुजी केली असली तरीही या पुलावरून अतिजड ट्रेलर्स व अवजड वाहनांची वाहतूक करणे उचित होणार नसल्याची बाब एम.एस.आर.डी.सी.ने सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतूक विभाग, कल्याण यांना मरारविम/०२/सव्यसं-(अभियांत्रिकी-१) भिकशी /न.क्र. १११-सी/६७१० दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचप्रमाणे याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीने मा. मुख्यमंत्री, मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री, जिल्हा ठाणे व वाहतूक नियंत्रण शाखा कल्याण यांना दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास देऊन सदर मार्गावरील अवजड वाहनांची वाहतूक बंद करण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्याप या मार्गावरून अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मार्गावरील अवजड वाहनांची वाहतूक विनाविलंब थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) भिंवडी कल्याण शिळ रस्त्यावरील काटई पुल हा रेल्वे विभागातर्फे १९६२ साली बांधण्यांत आला असुन सदर पुलाच्या दुरुस्तीकरीता रेल्वे विभागास कळविण्यात आले होते. उक्त रेल्वे उड्डाणपुलाच्या दुरुस्तीचे काम रेल्वे विभागामार्फत पुर्ण होऊन सदर पुल वाहतुकीसाठी (अवजड वाहनांसह) सुरु करण्यात आला आहे. या संदर्भात रेल्वे प्रशासनाशी पत्रव्यवहार सुरु आहे.

शिळ-कल्याण मार्गावरील काटई पुलावरुन जड अवजड वाहनांची मोठया प्रमाणात वाहतूक होत असल्याने वाहतुकीचे योग्य नियमन करण्यासाठी दिनांक २९/०९/२०१७ अन्वये अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. त्यानुसार सम विषम तारखेप्रमाणे आणि वेळेनुसार पनवेल, नवी मुंबईकडून येणारी जड अवजड वाहनांची वाहतूक बेलापुर रोडने ऐरोली-आनंदनगर चेक नाका-राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ वरुन तसेच खारेगाव टोलनाका येथुन मुंब्रा बायपास मार्गे जाण्यास प्रवेश बंदी केलेली आहे. या अधिसूचनेची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्हयात व्यापारी नितीन कटारीया आणि अंबड येथील गोविंद गगराणी यांच्या निघृण हत्या झाल्याबाबत

**(८२) * ३५५०८ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील व्यापारी नितीन कटारीया आणि अंबड येथील गोविंद गगराणी यांच्या निघृण हत्या झाल्याच्या घटना माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भरदिवसा होत असलेल्या हत्येच्या घटनांमुळे जिल्हयातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी तपासात पोलीस अधिकाऱ्यांनी दिरंगाई केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी आरोपींना पकडण्याबाबत व तपासात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

नितीन कटारीया यांच्या हत्येप्रकरणी दिनांक १९/०९/२०१७ रोजी सदर बाजार पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं. ६००/२०१७ कलम ३०२, १२० (ब) भा.दं.वि. सहकलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये तात्काळ गुन्हा दाखल करून ९ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्हा सध्या तपासावर आहे.

तर गोविंद गगराणी यांच्या हत्येप्रकरणी दिनांक २८/०८/२०१७ रोजी अंबड पोलीस स्टेशन, जालना येथे गु.र.नं.१६७/२०१७ कलम ३०२, २०१, १२०(ब), ३८४ भा.दं.वि. अन्वये तात्काळ गुन्हा दाखल करून ३ आरोपींना अटक करण्यात आली असून मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

सदर दोन्ही घटनांमध्ये तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात आली असल्याने जिल्ह्यातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले नाही.

(३) हे खरे नाही.

तपासात पोलीस अधिकाऱ्यांनी दिरंगाई केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## आंतरराष्ट्रीय किडनी रॅकेट प्रकरणाबाबत

**(८३) * ३४८५६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंतरराष्ट्रीय किडनी रॅकेट प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्र राज्यात पसरले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तपासात निष्पन्न झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरात किडनी खरेदी-विक्रीचे प्रकार मोठया प्रमाणात सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार या प्रकरणातील आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात एका आंतरराष्ट्रीय किडनी रॅकेट प्रकरणाबाबत सहार पोलीस ठाणे येथे गु.नो.क्र. २६०/२०१७, कलम - ३७०(१)(२), ४२०, ३४ भा.दं.वि. सह कलम १८, १९ दि ट्रान्सप्लॅटेशन ऑफ हयुमन ऑरगन्स व टिश्यु ॲक्ट १९९४ सह ट्रान्सप्लॅटेशन ऑफ हयुमन ऑरगन्स व टिश्यु ॲक्ट २०१४ अन्वये दिनांक ०५/०९/२०१७ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयात २ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

तसेच, बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०१५ ते १९ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत किडनी खरेदी-विक्रीबाबत पवई पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३५५/२०१६ कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब) भा.दं.वि.स. सह कलम १२, १९, २०, २१, मानवी अवयव प्रत्यारोपण अधि. १९९४ प्रमाणे दिनांक १४/०७/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगर चारकोप व कांदिवली येथील सोसायटयांना ना हरकत प्रमाणपत्र व पूर्णत्वाचा दाखला देणेबाबत

**(८४) * ३५७७४ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगर चारकोप व कांदिवली सेक्टर ८ व ९ येथे सन २००७-२००८ पासून नागरिक सोसायटया स्थापन करुन राहत असून त्यांनी म्हाडा व आयुक्त, मुंबई महापालिका यांचेकडे सातत्याने पाठपुरावा करुनही त्यांना ना हरकत प्रमाणपत्र व सोसायटी पूर्णत्वाचा दाखला देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सेक्टर ८ व ९ मधील सोसायटयांना म्हाडा व मुंबई महापालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र व सोसायटी पूर्णत्वाचा दाखला नसल्याने जास्त दराने पाणीपट्टी आकारली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार म्हाडा व महापालिकेकडून सोसायटयांना पूर्णत्वाचा दाखला व ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानुसार मुंबई उपनगर चारकोप व कांदिवली सेक्टर ८ व ९ येथील वसाहतींचा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने सादर केलेल्या अभिन्यासास दिनांक २४/०३/१९९४ रोजी मंजुरी देण्यात आलेली आहे. अल्प उत्पन्न गटांच्या धारकांसाठी बांधावयाच्या घराचे आराखडे सदरहू अभिन्यास मंजूरीत अंतर्भूत असल्यामुळे त्यांना स्वतंत्रपणे मंजुरी घेण्याची आवश्यकता नाही.
(२) म्हाडाकडून प्राप्त अहवालानुसार, संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांनी म्हाडामार्फत आकारणी केलेल्या अधिमूल्य रक्कमेचा भरणा अद्‌याप केलेला नसल्यामुळे सदर संस्थांना भोगवटा प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेली ना हरकत प्रमाणपत्रे म्हाडाकडून अद्‌याप देण्यात आलेली नाहीत.

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अहवालानुसार म्हाडामार्फत विकसित करण्यात आलेल्या सेक्टर ८ व ९ मधील १०७ संस्थांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे त्यांना मानवतावादी तत्वावर तात्पुरत्या जलजोडणी मनपा अधिनियम १९९२ अन्वये मंजुर करण्यात आलेले आहे. त्यांचा दर हा भोगवटाप्राप्त इमारतींना देण्यात आलेल्या जलजोडण्यांच्या दरापेक्षा जास्त आहे.
(३) संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांनी म्हाडामार्फत आकारणी केलेल्या अधिमूल्य रक्कमेचा भरणा म्हाडाकडे केल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्रासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल असे म्हाडाच्या अहवालात नमुद केले आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मालेगांव (जि.नाशिक) येथील गौण खनिजाच्या अवैध उत्खननाबाबत

**(८५) * ३५१७४ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे गौण खनिजाचे उत्खनन करून त्याची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनावर जप्ती व दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी दरमहा चाळीस हजार रुपयांची मागणी केल्याच्या आरोपावरून दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तहसिलदार, मालेगाव व गौण खनिज लिपिकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी पोलिसांनी तपास केला आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व बेकायदेशिर वाहतुकीप्रकरणी कोणकोण दोषी असल्याचे आढळून आले आहे,

(३) असल्यास, तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) होय.

श्री. मनोज पवार (तक्रारदार) यांच्या ४ वाहनांमध्ये गौण खनिजांची अवैध वाहतूक करू देण्यासाठी व या वाहनांवर यापुढे केसेस न करण्यासाठी आरोपी लोकसेवक डॉ.सुरेश कोळी, तहसिलदार मालेगांव जि.नाशिक व श्री.सुरेश पाटील, लिपीक टंकलेखक, तत्कालीन जमाबंदी-३ गौणखनिज, महसूल कार्यालय, मालेगांव यांनी तक्रारदाराकडे दरमहा ४०,०००/- रुपये लाच मागितल्याचे पडताळणी कारवाईमध्ये निष्पन्न झाल्याने दिनांक २२/०९/२०१७ रोजी त्यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदयातील कलमांन्वये गुन्हा दाखल केला असून दिनांक २३/०९/२०१७ रोजी दोन्ही आरोपी लोकसेवकांना अटक करण्यात आली आहे. या गुन्हयाचा तपास सुरू असून महसूल व वन विभागाने दोन्ही आरोपी लोकसेवकास अटकेच्या दिनांकापासून निलंबित केले आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयात आवश्यक उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८६) * ३५९१७ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयात दरवर्षी सुमारे २० हजार रुग्ण बाहयरुग्ण विभागात येतात तसेच ८८ हजार शस्त्रक्रिया होत असून एमआरआय, सिटीस्कॅन, डीएसए व पेट स्कॅन इत्यादी मशीन प्रत्येकी एकच असल्यामुळे रुग्णांना बराच काळ ताटकळत बसावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात १८०० खाटा व हजारो रुग्ण येत असल्यामुळे रुग्णालयावर ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयात आवश्यक उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबत व रुग्णालयावरील रुग्णसेवेचा ताण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालयात जानेवारी ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत एकूण १९,५२,४५६ बाह्यरुग्णांची नोंद झाली आहे. तसेच, सदर रुग्णालयात एकूण ५९,५८६ शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

सदर रुग्णालयात ७३९९ एम.आर.आय., ३२,०२० सीटीस्कॅन, डी.एस.ए. व १८६४ पेट स्कॅन करण्यात आले आहेत.

के.ई.एम. रुग्णालयात सद्य:स्थितीत २ सीटी स्कॅन, १ एम.आर.आय., १ डीएसए व १ पेट स्कॅन मशीन कार्यरत आहेत.

तसेच, १ एम.आर.आय. व १ डी.एस.ए. मशीन खरेदी करण्याची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इतर रुग्णालयांत नुतनीकरणाचे काम सुरु असल्यामुळे तेथील रुग्णांचा भार के.ई.एम. रुग्णालयावर पडत आहे ही वस्तुस्थिती आहे.

हा भार कमी करण्यासाठी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अन्य प्रमुख रुग्णालये व उपनगरीय रुग्णालयांतील रुग्णांच्या सोयीसाठी नवीन एम.आर.आय., सीटी स्कॅन, डी.एस.ए. व पेट स्कॅन इत्यादी मशीन्स खरेदीची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आलेली आहे.

-----------------

## चातगाव (ता.धानोरा, जि.गडचिरोली) येथील नर्सिंग कॉलेजच्या विद्‌यार्थीनीचे लैंगिक शोषण प्रकरणाबाबत

**(८७) * ३५११२ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चातगाव (ता.धानोरा, जि.गडचिरोली) येथील साळवे नर्सिंग कॉलेजच्या विद्‌यार्थीनीचे व्यवस्थापनाकडून मोठया प्रमाणात लैंगिक शोषण केले जात असल्याप्रकरणी जेष्ठ समाजसेविका डॉ.राणी बंग यांनी दिनांक २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी तसेच दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांच्याकडे लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नर्सिंग कॉलेजच्या चालकावर शासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक २१/०२/२०१७ रोजी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार चातगाव नर्सिंग कॉलेज येथील संस्थाचालक व संस्थापक यांचेविरूध्द पोलीस स्टेशन धानोरा येथे एकूण सहा गुन्हे दाखल केलेले असुन ते पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) अप क्र.०११/२०१७ भा.दं.वि.सं. कलम ३५४(अ), २९४, ५०४, ५०६ अन्वये दिनांक १८/०२/२०१७ रोजी गुन्हा नोंद केला आहे.

गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल केले आहे व प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(ब) अप क्र. १६/२०१७ भा.द.वि.सं. कलम ४२०, ३५४ (क), २९४, ५०४, ५०६ सह अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा कलम ३(१)(आर)(एस), ३(१)(जे) अन्वये दिनांक २१/०२/२०१७ रोजी गुन्हा नोंद आहे.

गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल केले आहे व प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(क) अप क्र. ००१४/२०१७ भा.द.वि.सं. कलम ४२०, ३५४(अ),२९४,५०६ सह अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा कलम ३(१)(आर)(एस), ३(१)(डब्ल्यू) अन्वये दिनांक २१/०२/२०१७ रोजी गुन्हा नोंद आहे.

गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल केले आहे व प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(ड) अप क्र. ००१२/२०१७ भा.दं.वि.सं. कलम २९४,३४२,५०४,५०६ सह नागरी हक्क संरक्षण कायदा कलम ७(अ)(१)(ड) तसेच अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा कलम ३(१)(आर)(एस), ३(१)(जे) अन्वये दिनांक २०/०२/२०१७ रोजी गुन्हा नोंद आहे.

गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल केले आहे व प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(इ) अप क्र.१५/२०१७ भा.द.वि.सं. कलम ४२०, ३५४(अ), ५०४, ५०६, ५०९ अन्वये दिनांक २१/०२/२०१७ रोजी गुन्हा नोंद आहे.

गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल केले आहे व प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(ई) अप क्र. २३/२०१७ भा.द.वि.सं. कलम ४२०, ४६८, ४७१ अन्वये दिनांक १५/०४/२०१७ रोजी गुन्हा नोंद असुन मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने गुन्हा सध्या पोलीस तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# मुंबईतील बहुतांश इमारतींमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित नसल्याबाबत

**(८८) * ३५८१७ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई अग्निशमन दलाने दिनांक १ जानेवारी, २०१० ते दिनांक १६ जून, २०१५ या कालावधीत केलेल्या पाहणीत मुंबईत ४,५९२ इमारतीत अग्निसुरक्षा नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले असून केवळ १४ इमारतीबाबत खटले सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार नियमांचे उल्लंघन केलेल्या उर्वरित इमारतीवर खटले दाखल करण्याची कारवाई करून मुंबईतील इमारतींमध्ये अद्यावत अग्निसुरक्षा यंत्रणा बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३० सप्टेंबर, २०१७ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील इमारतींमधील अग्निसुरक्षा उपाययोजनांची पाहणी केली असता, ४३३४ इमारतींच्या अग्निसुरक्षा उपाययोजनांमध्ये त्रुटी असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.

(२) सदर ४३३४ इमारतींना, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये नोटीस बजावून त्यांना ठराविक मुदतीमध्ये त्रुटींची पुर्तता करण्याचे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आले.

सदर इमारतींपैकी ४३२४ इमारतींनी, त्यांना दिलेल्या मुदतीत अग्निसुरक्षा उपाययोजनांच्या त्रुटींची पुर्तता केली आहे.

ज्या १० इमारतींनी त्रुटींची पुर्तता केली नाही त्यापैकी ५ इमारतींविरोधात खटले दाखल करण्यात आले असून, ५ इमारतींविरोधात खटले दाखल करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे मुलुंड (प)(ता.कुर्ला) येथील आरक्षित जागेबाबत

**(८९) * ३५५०३ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मुलुंड (प)(ता.कुर्ला) येथील न.भू.क्र. ८८९ क्षेत्रातील २२ गुंठे जमीन स्मशान भूमीसाठी आरक्षित ठेवण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मशान भूमीसाठी आरक्षित असलेल्या जागेवर येथील सोसायटीने वास्तव्य करत असलेल्या आदिवासी जमीन मालकाची संमती न घेता तसेच जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय गैरआदिवासी विकासक यांना सोसायटीने आदिवासी यांची जमीन हडप करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधकाम करण्यासाठी विकासाचा करारनामा करुन दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत ५२ घरे असतांना २५० घरे दाखविले आहेत, तसेच आदिवासी विकासक, झोपडपट्टी पुनर्वसन योजना, म्हाडा, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी मिळून बनावट कागदपत्र बनवून आदिवासींची जमीन हडप करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय जमीन हडप करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत गैरव्यवहार करण्याऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अहवालानसार सदर भूखंडावर स्मशानभूमीचे आरक्षण नाही.

(२) हे खरे नाही.

सदर जमीन शासन मालकीची असून मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखडयानुसार सदर भूखंडावर रेसिडेन्शियल झोन (Residential Zone) दर्शविला असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(३) हे खरे नाही.

सदर योजनेचे परिशिष्ट-२ मुख्य अधिकारी (मुंबई मंडळ) म्हाडा यांच्यामार्फत प्रमाणित करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत एकूण २४७ झोपडया असून त्यातील २०६ झोपडया पात्र व ४१ झोपडया अपात्र घोषित करण्यात आल्या असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अर्धापूर-नांदेड राष्ट्रीय महामार्गालगत शिवारात पोलिसांनी छापा टाकून विदेशी दारु जप्त केल्याबाबत

**(९०) * ३५५८० श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर तालुक्यातील अर्धापूर-नांदेड राष्ट्रीय महामार्गालगत शिवारातील एका शेतकऱ्याच्या आखाडयावर पोलिसांनी छापा टाकून सुमारे दोन लाख रुपयांची विदेशी दारु जप्त केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन विदेशी दारुचा अवैध साठा करणाऱ्या शेतकऱ्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर ठिकाणी पोलिसांनी दिनांक १८/०९/२०१७ रोजी छापा टाकून एकूण २,०५,१७०/- रुपये किंमतीची विदेशी दारु जप्त करण्यात आलेली आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, अर्धापूर येथे गु.र.नं. २६१/२०१७ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई), ८३ अन्वये दिनांक १८/०९/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन उक्त गुन्ह्यात २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यावर सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## मोहोळ (जि.सोलापूर) शहरात स्वच्छता मोहिम राबविण्याबाबत

**(९१) * ३५५२३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ (जि.सोलापूर) शहरात सतत पडणाऱ्या पावसामुळे ठिकठिकाणी दलदल झाली असून गटारीचे पाणी साचल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे तसेच नळाला अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याने साथीचे आजार वाढले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतानाही येथील नगरपरिषदेकडून स्वच्छतेबाबत मोहिम राबविली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन येथे स्वच्छता मोहिम राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सतत पडणाऱ्या पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साठल्याने शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढला होता, हे खरे आहे. तथापि नळाला अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याने साथीचे आजार वाढले, हे खरे नाही.

शहरात नगरपरिषदेकडून शुध्द पाण्याचा पुरवठा केला जात असून माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविलेले पाण्याचे सर्व नमूने "पिण्यास योग्य" असल्याचे आढळून आलेले आहे.

(२) व (३) नगरपरिषदेकडून स्वच्छता मोहिम राबविली जात नाही, हे खरे नाही.

नियमित साफसफाई बरोबरच नगरपरिषदेने दिनांक ०२/१०/२०१७ रोजी विशेष स्वच्छता मोहिम राबविली आहे. तसेच डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक त्या शास्त्रशुध्द पध्दतीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिकेला मुलभूत सुविधेकरिता अल्प निधी दिला असल्याबाबत

**(९२) * ३५६०२ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेची स्थापना सन २००१ झाली असून सदर महानगरपालिकेला मुलभूत सुविधेकरिता सुरुवातीपासूनच अल्प निधी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील पाच वर्षात उक्त महापालिकेला मुलभूत सुविधेकरिता व ४२१४ व २२११ या व अन्य लेखाशिर्ष अंतर्गत सन २०१३-१४ ते २०१६-१७ या वर्षात किती निधी प्राप्त झाला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त निधीचे नियोजन अकोला महानगरपालिकेला न देता सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले असून उक्त निधीमधून उरलेल्या सर्व रक्कमेचे नियोजन काही विशिष्ट व्यक्तीचे काम घेऊनच करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अकोला महापालिकेला ४२१७ या लेखाशिर्ष अंतर्गत मिळालेल्या निधीमध्ये भेदभाव करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अकोला महानगरपालिकेस सन २०१३-१४ ते सन २०१६-१७ या चार वर्षात मुलभूत सुविधेकरीता खालीलप्रमाणे निधी वितरीत केला आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | वितरीत निधी (रुपये कोटी) |
|---|---|---|
| १. | २२१७ ०९१३ | ७१.३७ |
| २. | ४२१७ ०५४१ | ५३.०८ |
| | एकूण | १२४.४५ |

(३) व (४) उपरोक्त एकूण रुपये १२४.४५ कोटीच्या निधीचे नियोजन करताना, रुपये ५६.४० कोटी करीता महानगरपालिका कार्यान्वयन यंत्रणा असून, रुपये ६८.०५ कोटी करीता सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यान्वयन यंत्रणा ठेवण्यात आली आहे. सदरच्या सर्व निधीमधून कामे हाती घेताना, महानगरपालिका क्षेत्रातील कामांची प्राथम्यता विचारात घेतली असून, विशिष्ट व्यक्तीचे काम घेतलेले नाही, त्यामुळे भेदभाव करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत येणाऱ्या खाजगी बसेसना प्रवेशबंदी केल्याबाबत

**(९३) * ३६०७१ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विविध भागातून मुंबईत येणाऱ्या खाजगी बसेसना सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.३० या कालावधीत मुंबईत प्रवेशबंदी केल्याबाबतचे परिपत्रक राज्य परिवहन विभागाने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान काढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या परिपत्रकाच्या निषेधार्त ३३ हजार बस चालकांनी संपावर जाण्याचे शासनास लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) सदर परिपत्रक मुंबई वाहतूक विभागातर्फे काढण्यात आले होते.
(२) सदर अधिसूचनेतील तरतूदी या खाजगी प्रवासी बस मालक-चालक संघटनांना अडचणीच्या वाटल्याने काही संघटनांनी संपावर जाण्याबाबत कळविले होते.
(३) मुंबई वाहतूक विभागातर्फे बृहन्मुंबई शहरातील जनतेस वाहतूकी दरम्यान होणार अडथळा आणि गैरसोय टाळण्यासाठी तसेच वाहतूक सुरळीत चालण्याकरीता व वाहतुकीचे व्यवस्थापन योग्यरितीने होण्याकरीता मुंबई शहरात बाहेरुन येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या अवजड वाहनांना व प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या खाजगी बसेसना मुंबई शहरात सकाळी ०७.०० ते ११.०० पर्यंत व सायंकाळी १७.०० ते २२.०० पर्यंत प्रवेश करण्यास व सर्व प्रकारच्या रस्त्यावर धावण्यास प्रायोगिक तत्वावर दिनांक १२/०९/२०१७ च्या अधिसूचनेन्वये निर्बंध घालण्यात आले होते. सध्या सदर अधिसूचनेची अंमलबजावणी स्थगित ठेवण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेतील अनुकंपातत्वावरील पदे भरण्याबाबत

**(९४) * ३५६९६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेत अनुकंपा तत्त्वावरील हजारो अर्ज गेली साडेचार वर्षापासून प्रलंबित असल्याने प्रशासनाच्या दिरंगाईमुळे अनुकंपा तत्त्वावरील कामगारांचे नुकसान होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कित्येक अनुकंपाधारकांची वयोमर्यादा उलटून गेल्यामुळे त्यांना सेवेपासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील पदे भरण्याबाबत धोरण आखून प्रतिक्षेत असलेल्या अनुकंपाधारकांना सेवेत समावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत अनुकंपा तत्वावर विविध पदांवरील नियुक्तीसाठी सन २०१७ मध्ये मंजुर केलेल्या २५५ प्रकरणांपैकी कार्यालयीन शिपाई पदांवर नियुक्तीसाठी ८५ उमेदवार प्रतिक्षा यादीवर असून, अन्य उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.